# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे अधिवेशन, २०२४

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०३ जुलै, २०२४ / आषाढ १२, १९४६ (शके)**

**मुख्यमंत्री } यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५९**

---

## वाई (जि.सातारा) नगरपरिषद येथील कर्मचारी २७ वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असल्याबाबत

**(१)** * **२३७५२ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१० मध्ये राज्य शासकीय संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांबाबत धोरण निश्चित करुन शासन निर्णयदेखील निर्गमित केला असून, सदर शासन निर्णयामध्ये "राज्य संवर्गातील कर्मचाऱ्यास एका जिल्ह्यामध्ये ६ वर्षपेक्षा जास्त काळ सेवेत राहता येत नाही " अशी तरतूद आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वाई (जि.सातारा) नगरपरिषदेमध्ये दिनांक ५ ऑगस्ट, १९९६ रोजी रुजू झालेले एक कर्मचारी २७ वर्षे होऊनही वाई नगरपरिषदेमध्ये आहे त्याच ठिकाणी सेवेत कार्यरत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दरम्यानच्या काळात त्यांची अमरावती विभागांतर्गत मुर्तिजापूर येथे पदोन्नतीने बदली झालेली असताना सदर बदली नाकारुन ते पुन्हा वाई नगरपरिषदेमध्येच कार्यरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, त्याबाबत मा.आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन, नवी मुंबई यांचेकडे दिनांक १ डिसेंबर, २०२३ रोजीपासून केलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय व त्यानुसार त्या कर्मचाऱ्याने अन्य ठिकाणी झालेली पदोन्नतीने बदली नाकारण्याची कारणे काय व याप्रकरणी शासनाने कोणती कारवाई केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) शासन निर्णय दिनांक ११/०५/२०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेल्या नगरपरिषदांमधील राज्यस्तरीय संवर्गातील कर्मचाऱ्याच्या बदली धोरणामध्ये सदर तरतूद आहे.

(२) होय.

(३) होय.

(४) दिनांक ०१/१२/२०२३ अन्वये केलेल्या तक्रारीबाबत सह आयुक्त, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्या अहवालानुसार तक्रारीमध्ये सकृतदर्शनी तथ्य आढळून येत नाही.

संबंधित कर्मचारी यांनी कौटुंबिक कारणास्तव पदोन्नती नाकारली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषदेने पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत

**(२) * २३२४९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीवर्धन, रोहा (जि.रायगड) या शहरांमध्ये पाणीपुरवठा योजना राबविल्या जात असताना अलिबाग हे तालुक्याचे ठिकाण असतानाही या नगरपरिषद हद्दीमध्ये अद्यापपर्यंत पाणीपुरवठा योजना राबविण्यात आली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिबाग येथे अनेक शासकीय कार्यालये, शासकीय निवासस्थाने तसेच पर्यटक मोठ्या प्रमाणात येत असल्याने सन २०११ च्या जनगणनेनुसार अलिबाग शहराची लोकसंख्या २० हजार होती परंतु वाढत्या नागरीकरणाबरोबरच शहराची लोकसंख्या वाढली असताना शहरातील नागरिकांना आजही टँकर मार्फत पाणीपुरवठा केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अलिबाग (जि.रायगड) येथे नगरपरिषदेकडून पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याबाबत शासनाकडून प्रशासकीय मान्यता देऊन किती कालावधीत निधी उपलब्ध करून देण्यात येईल,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने अलिबाग (जि.रायगड) नगरपरिषदेकडून पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अलिबाग शहराला सद्य:स्थितीत सन १९९२ च्या पाणीपुरवठा योजनेद्वारे शहराला पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

अलिबाग शहराला सद्य:स्थितीत सन १९९२ च्या पाणीपुरवठा योजनेद्वारे शहराला पाणीपुरवठा करण्यात येत आहे. परंतु शहरातील वाढत्या लोकसंख्येमुळे काही भागात कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने त्या ठिकाणी नगरपरिषदमार्फत टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येतो.

(३), (४) व (५) अलिबाग शहराचे वाढते नागरीकरण विचारात घेता अलिबाग नगरपरिषदमार्फत नगरोत्थान महाभियानांतर्गत वाढीव पाणीपुरवठा योजना तसेच अस्तित्वातील जलवाहिनीचे नूतनीकरण असा रुपये ५२.३८ कोटी किंमतीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून सदर प्रस्ताव विहित कार्यपध्दतीनुसार शासनाकडे सादर करण्याची कार्यवाही मुख्याधिकारी, अलिबाग नगरपरिषद यांच्याकडून सुरू आहे.

सदर प्रकल्पाचा प्रस्ताव विहित मार्गाने तांत्रिक व इतर प्रशासकीय बाबींच्या पूर्ततेसह शासनास प्राप्त झाल्यानंतर नगरोत्थान महाभियानांतर्गत विचारात घेण्यात येईल.

-----------------

## यवतमाळ नगरपरिषदेच्या घनकचरा निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत

**(३) * २२९८७ श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ नगरपरिषदेच्या घनकचरा निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहाराच्या प्रकरणातील संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करण्याबाबतचा प्रस्ताव मा.मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे पाठविण्यात आला असून, मा.मुख्यमंत्री यांच्या मान्यतेनंतर एका आठवड्यात विभागीय आयुक्त यांच्याकडून कारवाई करण्यात येईल असे आश्वासन प्रभारी मा.नगरविकास मंत्री यांनी माहे डिसेंबर, २०२३ च्या हिवाळी अधिवेशनात सभागृहात दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रभारी मा.नगरविकास मंत्री यांनी सभागृहात आदेश देऊन ४ महिन्यांचा कालावधी होऊनही सदर प्रकरणी कारवाई झाली नसल्यामुळे यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी करुन कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) बाबत, यवतमाळ नगरपरिषदेच्या घनकचरा निविदा प्रक्रियेतील गैरव्यवहाराच्या प्रकरणातील संबंधित तत्कालीन मुख्याधिकारी श्री.डोल्हारकर यांच्याविरुध्द विभागीय आयुक्तांनी जी कारवाई योजलेली आहे ती करण्याचे निर्देश दिले जातील असे आश्वासन दिलेले आहे. श्री.डोल्हारकर, तत्कालीन मुख्याधिकारी, यवतमाळ नगरपरिषद यांच्याविरुध्द सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या नियम ८ खाली दिनांक २५/०४/२०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये दोषारोप पत्र बजावून विभागीय चौकशी सुरु करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेंतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणेबाबत

**(४) * २३०४१ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या नवीन आकृतीबंधात कायमस्वरुपी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या ७४ पदांना मान्यता देऊन त्यापैकी १० वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे भरलेली असून ६४ पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कंत्राटी तत्वावर १९ वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणुका केलेल्या आहेत, परंतु त्यांना सेवा सातत्याची सुरक्षा व वेतन कमी असून त्यांना सूचना न देता त्यांची सेवा समाप्त करण्यात आल्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने कंत्राटी पदभरतीकरीता ४ वेळा जाहिरात देऊनसुध्दा मुलाखतीस कोणीही उमेदवार उपस्थित राहिले नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील महानगरपालिकेने एन-८ येथे मेल्ट्रान येथे सुसज्ज रुग्णालयाची उभारणी केली, परंतु मनुष्यबळ नसल्यामुळे शहरातील गरीब नागरिकांना रुग्ण सेवा देण्यास अडचणी येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, छत्रपती संभाजीनगर येथील नागरिकांना वैद्यकीय सेवा देण्याच्या दृष्टीने आकृतीबंधाप्रमाणे मान्य असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त जागा भरणेसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम.) अंतर्गत वैद्यकीय अधिकारी संवर्गाची ४१ पदे मंजूर असून २९ पदे भरलेली आहेत.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम.) अंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या धोरणानुसार सेवा, सेवासातत्याची सुरक्षा, ठराविक वेतन, सेवा समाप्ती तसेच इतर नियमांची अंमलबजावणी केली जाते.

महानगरपालिकेकडून सन २०२३ व २०२४ मध्ये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत वैद्यकीय अधिकारी पद भरतीची जाहिरात ३ वेळा अनुक्रमे १९, १८ व ०४ इतक्या जागांसाठी प्रसिध्द करण्यात आली होती. यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पदाच्या मुलाखतीसाठी पात्र ठरलेले अनुक्रमे ८५, ९० व २२ इतके उमेदवार मुलाखतीसाठी हजर झाले असून निवडलेल्या उमेदवारांना सदर ४१ जागांवर नियुक्ती देण्यात आली होती.

सार्वजनिक आरोग्य विभाग/ लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड, पदव्युत्तर प्रवेश परीक्षेची तयारी इत्यादी वैयक्तीक कारणांमुळे राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (एन.यु.एच.एम.) अंतर्गत नियुक्ती केलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी राजीनामे दिल्यामुळे काही पदे रिक्त झाली असून सदर रिक्त पदे भरण्याची कार्यवाही महानगरपालिकेकडून पुन्हा करण्यात येत आहे.
(३) हे खरे नाही.

सिडको एन-८ येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयात पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध असून तेथे प्रसुती, कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया व राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत सर्व सेवा दिल्या जातात.

कोविड-१९ विषाणूबाधित रुग्णांच्या उपाययोजनांसाठी कोविड केअर सेंटर विकसित करून चिकलठाणा येथील मेल्ट्रॉन हॉस्पिटलची इमारत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) कडून महानगरपालिकेकडे तात्पुरत्या स्वरुपात सन २०२० मध्ये हस्तांतरीत करण्यात आली.

सदर इमारत महानगरपालिकेकडे कायमस्वरुपी हस्तांतरीत करणेबाबत महानगरपालिकेने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) यांना दिनांक २२/११/२०२२ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

सद्य:स्थितीत महानगरपालिकेकडून मेल्ट्रॉन हॉस्पिटल येथे बाह्यरुग्ण सेवा, राष्ट्रीय कार्यक्रमांतर्गत सेवा, उष्माघात कक्ष तसेच उपचार दिले जातात.

मेल्ट्रॉन येथे कंत्राटी तत्वावर विविध संवर्गातील मनुष्यबळ नियुक्तीबाबत कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(४) छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या आस्थापना खर्चाची टक्केवारी सध्या ४१.६४ टक्के असून ती ३५% या निकषापेक्षा जास्त असल्याने मंजूर आकृतीबंधातील आरोग्य अधिकारी यांची आवश्यक पदे भरण्याकरीता मान्यता घेणेबाबतची कार्यवाही महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सांगली जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यालये एकत्रित करण्याबाबत

**(५)** * **२३३४५ श्री.गोपिचंद पडळकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कामकाज माधवनगर रोडवरील मुख्य कार्यालय, सावळी व पाटगाव (ता.मिरज) अशा तीन ठिकाणांहून करण्यात येत असल्याने अधिकाऱ्यांना व वाहनधारकांना परवान्यासाठी दररोज ५० ते ६० कि.मी. चे अंतर पार करावे लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्वाधिक महसूल देणाऱ्या सांगली जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडे शासनाचे दुर्लक्ष होत असून, सदरहू ठिकाणची सर्वच कार्यालये अपुऱ्या आणि गैरसोयीच्या जागेत कार्यरत आहेत तसेच बुधगाव रोड (ता.मिरज) येथील कार्यालयामध्ये पायाभूत सुविधांचा अभाव असल्यामुळे नव्या जागेत प्रस्तावित असलेले स्थलांतरही अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सांगली जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यालये तीन ठिकाणी असल्याने अधिकारी तसेच वाहनधारकांची गैरसोय होत असून सदरहू कार्यालये एकत्रित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व वाहनधारकांनी शासनाकडे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सांगली जिल्ह्यातील उप प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यालये एकत्रित करुन एकाच ठिकाणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत: खरे आहे.
उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, सांगली येथील कामकाज हे माधवनगर रोड येथे प्रशासकीय कामकाज व शिकाऊ अनुज्ञप्ती, सावळी येथे पक्की अनुज्ञप्ती चाचणीचे कामकाज व पाटगांव येथे परिवहन संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र व नूतनीकरणाचे कामकाज या तीन ठिकाणी केले जाते.
(२), (३) व (४) उप प्रादेशिक परिवहन कार्यालयास जुना बुधगाव रोड वरील गट क्र.१३८/१३९/१४०/२ येथे ४४.७६ आर एवढी जागा मंजूर असून सदर जागेत कार्यालयीन इमारत बांधकाम प्रगतीपथावर असून इमारतीचे फर्निचर, इतर अनुषांगिक कामकाज पूर्ण होताच उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे त्या जागेत स्थलांतरण करुन नियमितपणे कामकाजाचा निपटारा करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत

**(६) * २३५७६ श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये मराठा समाजास आरक्षण मिळण्याबाबतचा कायदा विधीमंडळाच्या गत सत्रात संमत झाला असून त्याद्वारे मराठा समाजातील उमेदवारांना आरक्षण जाहीर करुनही त्यांना वेळेत दाखला न मिळाल्यामुळे खुल्या प्रवर्गातून अर्ज भरावे लागत असल्याचे तसेच मराठा आंदोलकांनी लोकसभा निवडणुकीनंतर पुन्हा राज्यात आंदोलनाचा इशारा दिला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मराठा समाजास १०% आरक्षण देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र देण्यास विलंब होत असून, मराठा आरक्षणाबाबत प्राप्त झालेल्या हरकतीवर शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मराठा उमेदवारांना १० टक्के आरक्षणाचे दाखले मिळेपर्यंत महापोलीस भरतीचे अर्ज दाखल करण्याची मुदत वाढविण्याबाबत तसेच आंदोलकांच्या मागणीनुसार सगेसोयरे संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत व मराठा समाजास दिलेले १०% आरक्षण मा.उच्च न्यायालयात टिकण्यासाठी कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील मराठा समाजाला १० टक्के आरक्षणाचे दाखले आणि नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र देण्याच्या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही. तथापि, मराठा आंदोलकांचे निवेदन दिनांक २२/०५/२०२४ रोजी शासनास प्राप्त झाले आहे.

(२) दिनांक ११/०३/२०२४ चे शासन परिपत्रक व दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या असून जिल्हापातळीवर सर्व संबंधित यंत्रणेला प्रमाणपत्रे प्रदान करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत.

(३) मराठा उमेदवारांना एसईबीसी आरक्षणाचे दाखले प्राप्त करून घेऊन महापोलीस भरती जाहिरातीमध्ये अर्ज करण्यासाठी शासनाने दिनांक १५/०४/२०२४ पर्यंत मुदतवाढ दिली होती.

सगेसोयरे संदर्भात दिनांक २६/०१/२०२४ रोजी प्रारूप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली या प्रारूप अधिसूचनेसंदर्भात जनतेच्या हरकती व सूचना दिनांक १६/०२/२०२४ पर्यंत मागविण्यात आल्या. त्यानुसार ८ लाखांहून अधिक हरकती व सूचना शासनास प्राप्त झाल्या असून त्यांची छाननी करण्याची कार्यवाही सुरू आहे.

एसईबीसी आरक्षण अधिनियम, २०२४ विरोधात दाखल झालेल्या याचिकांमध्ये शासनाच्या वतीने मा.उच्च न्यायालयात भक्कमपणे बाजू मांडण्यात येत आहे.

(४) दिनांक ११/०३/२०२४ चे शासन परिपत्रक व दिनांक १५/०३/२०२४ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये जात प्रमाणपत्र व नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र वितरणाबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## दादर (मुंबई) येथील आय. टी. पार्कसाठी राखीव भूखंडावर अनधिकृत इमारतीचे बांधकाम करण्यात आल्याबाबत

**(७) * २३६२१ अ‍ॅड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दादर (मुंबई) रेल्वे स्टेशनच्या शेजारील सेनापती बापट मार्गावरील सुमारे ११ एकरचा भूखंड आय. टी. पार्कसाठी राखीव असूनही सदर भूखंडावर अनधिकृत बांधकाम करण्यात आल्याचे माहे एप्रिल, २०२४ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंड आय. टी. पार्कसाठी आरक्षित असतानाही बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी संबंधित विकासकाशी संगनमत करुन त्या ठिकाणी इमारत उभी करुन बेकायदेशीरपणे इमारतीतील गाळे ४५० कापड व्यापाऱ्यांना विकले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर बेकायदेशीर गाळे विक्रीप्रकरणी बृहन्मुंबई महानगरपालिकेने सुमारे ४५० कापड व्यापाऱ्यांना नोटीसा बजाविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने आयटी पार्कसाठी आरक्षित भूखंडावर अनधिकृत इमारती बांधणारे विकासक तसेच संबंधित दोषी अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे नाही.

दादर (मुंबई) येथील सेनापती बापट मार्गावरील कोणताही भूखंड आय.टी.पार्कसाठी राखीव नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जी/उत्तर विभाग कार्यालयाने त्यांच्या अधिकार क्षेत्रातील अनधिकृतपणे वापरातील बदल केलेल्या व पोटमाळा बांधलेल्या एकूण ३५५ गाळेधारकांविरुध्द मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये नोटीस बजावण्यात आली असून त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) व(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत मिळकतींच्या हस्तांतरण शुल्कात वाढ करण्यात आल्याबाबत

**(८) * २३७६३ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मिळकतीचे खरेदी / विक्री, वारसाहक्क इत्यादीमुळे हस्तांतरण झाल्यास उक्त नोंदी करणेकामी हस्तांतरण फी ची आकारणी करताना करयोग्य मुल्याच्या ५ % हस्तांतरण फी वसूल करण्यात येत होती परंतु, सद्य:स्थितीत खरेदीखत / विक्री / बक्षीसपत्र या सारखे दस्त नोंदविताना नोंदणी मुद्रांक शुल्क विभागामार्फत त्या मिळकतीचे चालू बाजारभावाचे मुल्यांकनानंतर आधारित किंमत ठरवून त्या किंमतीवर मुद्रांक शुल्क (Stamp Duty) ठरविण्यासाठी शासन जे बाजारमूल्य विचारात घेते, त्या बाजारमुल्याचे ०.५% मिळकत हस्तांतरण फी आकारण्याचे आदेश काढण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूर्वी प्रचलित दराप्रमाणे करयोग्य मूल्याच्या ५ % इतकी हस्तांतरण फी आकारण्यात येत असताना मात्र आता नवीन निर्णयानुसार एक वर्षापेक्षा जास्त कालावधी झाल्यास हस्तांतरण फी ही नवीन प्रचलित दराने लागू असलेल्या रकमेच्या १० % प्रति वर्ष याप्रमाणे विलंब शुल्क आकारण्याचे आदेशही देण्यात आले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नोंदविलेल्या दस्ताला मान्यता देण्याचे अधिकार शासनास असून महानगरपालिकेचे काम हे दस्त नोंदविल्यानंतर फक्त त्याची मिळकत करासाठी नोंद करून घेण्याचे असून त्या दस्ताला कुठल्याही प्रकारची मान्यता देण्याचे नसते, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, महानगरपालिका हद्दीतील मिळकतींकडून मिळकत कर वसूल करण्यात येऊन ज्या मिळकतींचे हस्तांतरण झाले आहे अशा मिळकतींचे हस्तांतरण करताना संपूर्ण मिळकत कर भरूनच त्यांची हस्तांतरण नोंद महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येत असूनही हस्तांतरण शुल्कामध्ये करण्यात आलेली वाढ पूर्ववत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशत:खरे आहे.

जिथे आर्थिक व्यवहार घडून आला आहे तिथेच ०.५ % हस्तांतरण शुल्क आकारण्यात येते. वारसा हक्क, रक्त संबंधी बक्षीस पत्र असे व्यवहार जिथे आर्थिक व्यवहार घडून आलेला नाही अशा दस्तामध्ये रुपये १०० ते रुपये ५०० इतके नाममात्र मूल्य आकारण्यात येते.

(२) हे खरे आहे.

(३) होय.

परंतु, आकारणी पुस्तकात नोंद असलेल्या मालमत्तेच्या प्रकरणी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची ‘ड’ प्रकरण ८ कराधान नियम १ व २ मधील तरतूदीनुसार मालमत्ता हस्तांतरणासाठी नोटीस देणे व अशा हस्तांतरणासाठी नियम ३ मधील तरतुदीनुसार हस्तांतरण फी भरणा करणे आवश्यक आहे.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**~~छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेने शहराचा चुकीचा~~**
**~~प्रारुप विकास आराखडा तयार केल्याबाबत~~**

~~**(९) * २३८९६ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-~~

`

**मा.सदस्यांचे सदस्यत्व निलंबित करण्यात आल्याने प्रश्न वगळण्यात आला आहे.**

-----------------

## राज्यातील चर्मकार समाजातील नागरिकांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(१०) * २३४७९ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चर्मोद्योग महामंडळाचे सर्व थकीत कर्ज बिनशर्त माफ करावे व पुढील कर्ज जाचक अटी रद्द करून सरळ पध्दतीने देण्यात यावे या प्रमुख मागणीसह इतर अनेक मागण्या चर्मकार समाज बांधवांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केल्या असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गटई कामगारांना महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषद व ग्रामपंचायत स्तरावर बैठा (पीच परवाना) व अपघात आरोग्य विमा देण्यात यावा, देवनार येथील महामंडळाच्या जागेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे आधुनिक लेदर हब क्लस्टर व प्रशिक्षण, जागतिक दर्जाचे विक्री केंद्र तसेच होस्टेल उभारण्यात यावे, वांद्रे येथील एकमेव चर्मकला महाविद्यालय पूर्ववत करून लेदर इंजिनियरिंग पदवी व इतर लेदर कोर्सेस सुरू करण्यात यावे, चर्मोद्योग महामंडळ तसेच चर्मकार कल्याण आयोग यांचे अध्यक्ष व संचालक मंडळ यांच्या तात्काळ नियुक्त्या करण्यात याव्यात यासह अन्य मागण्यां मा.मुख्यमंत्री महोदयांकडे चर्मकार समाजातल्या नागरिकांनी केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय हे खरे आहे.

(३) उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने दिनांक १२ फेब्रुवारी, २०२४ रोजी मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली सहयाद्री राज्य अतिथिगृह येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचे इतिवृत्त मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले आहे. तद्नंतर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील इमारतींमधील आगींच्या घटना रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(११) * २३६४२ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईत मागील तीन वर्षांत आगीच्या १३ हजार घटना घडल्या असून त्यात ६५ जणांचा दुर्दैवी मृत्यू व ४७३ जण जखमी झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२४ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईत गेल्या काही दिवसांत आगीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने अग्निशमन दलाने इमारतींमधील अग्निसुरक्षा तपासणीसाठी गेल्या वर्षभरात ११३० इमारतींची तपासणी केली, त्यात २७८ इमारतींमध्ये अग्निशमन यंत्रणा बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर इमारतींना नोटीसा बजाविण्यात आल्या असून, यंत्रणा कार्यान्वित न केल्यास वीज व पाण्याच्या जोडण्या कापण्याचा इशारा अग्निशमन दलाने दिला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर नोटीशीनुसार किती इमारतींनी यंत्रणा कार्यान्वित केली व उर्वरित इमारतींवर शासनातर्फे कारवाई करण्यात येणार आहे काय,
(५) असल्यास, भविष्यात आगीच्या घटना टाळण्यासाठी फायर ऑडिट व अग्निशमन यंत्रणा प्रभावी असणे आवश्यक असून उंच इमारतींमध्ये आगीच्या घटना रोखण्यासाठी फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट बसविण्याबाबत मार्गदर्शक तत्त्वे व नियमावली जारी करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे,
(६) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करून मुंबईतील इमारतींमधील आगीच्या घटना रोखण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) माहे जानेवारी, २०२३ ते डिसेंबर, २०२३ या कालावधीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत एकूण १२७० इमारतींची अग्निसुरक्षाविषयक तपासणी करण्यात आली असता सदर तपासणीमध्ये २७८ इमारतींमधील आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजनांमध्ये त्रुटी आढळून आल्या.

सदर त्रुटींची विहित कालावधीत पूर्तता करण्यासाठी संबंधितांना महाराष्ट्र आगप्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ नुसार नोटीस बजावण्यात आल्या होत्या. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अहवालानुसार संबंधित सर्व भोगवटादारांनी २७८ इमारतींत विहित कालावधीत त्रुटींची पूर्तता केली आहे.
(५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ७० मी. पेक्षा उंच इमारतींमध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट बसविण्यासाठी मार्गदर्शक तत्वे व नियमावली जारी करण्यात आलेल्या आहेत. सदर मार्गदर्शक तत्वे व नियमावलीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील ७० मी. पेक्षा उंच इमारतींच्या बांधकामासाठीच्या प्रस्तावांना “तात्पुरती आगसंरक्षक मान्यता” देतेवेळी सदर इमारतींमध्ये फायर इव्हॅक्युएशन लिफ्ट बसविणे अनिवार्य करण्यात आले आहे.

-----------------

## शासन सेवेतील पदांकरिता प्रचलित असलेल्या बिंदुनामावलीबाबत

**(१२) * २३१९९ श्री.आमश्या पाडवी : तारांकित प्रश्न क्रमांक २१६२७ ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनसेवेतील पदांकरीता सन १९९७ पासून प्रचलित असलेल्या बिंदू नामावलीत दिनांक २५ फेब्रुवारी, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदल करण्यात आले असून, उक्त शासन निर्णयात केलेल्या बदलामुळे छोट्या संवर्गातील भरतीत अनुसूचित जमातीच्या उमेदवारांवर अन्याय होत असून सदरहू बिंदू नामावली पूर्ववत करण्यात यावी अशी मागणी लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने तसेच जनजाती सल्लागार परिषदेच्या ५१ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार बिंदू नामावली ही सन १९९७ नुसार पूर्ववत करणेबाबत मा.मुख्यमंत्री यांनी सामान्य प्रशासन विभागास शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर शिफारशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २५/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाविरूध्द ऑल इंडिया आदिवासी एम्लॉईज फेडरेशन, नागपूर यांनी मा.उच्च न्यायालय, नागपूर, खंडपीठ नागपूर येथे रिट याचिका क्र.३३०१/२०२२ दाखल केलेली असून सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. सदर प्रकरणी शासनाच्या वतीने दिनांक २६/०५/२०२३ रोजी शपथपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या अंतिम निर्णयानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जमातीमधील अधिसंख्य पदांवरील अधिकारी आणि कर्मचारी यांचे सेवाविषयक लाभासाठी शुध्दीपत्रक काढणेबाबत

**(१३) * २३१०७ श्री.प्रवीण दटके, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जात प्रमाणपत्र अवैध ठरविले किंवा देऊ न शकणाऱ्या अनुसूचित जमातीच्या अधिकारी/ कर्मचारी यांना दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार ‘अधिसंख्य‘ पदावर वर्ग करण्यात आले असून, त्यांना सेवाविषयक व सेवानिवृत्तीविषयक लाभ देण्याबाबतच्या दिनांक १४ डिसेंबर २०२२ रोजीच्या शासन निर्णयात त्रुटी असल्यामुळे राज्यातील ७०% स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सदर निर्णयाची अंमलबजावणी होत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या सेवेत १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्याबाबतच्या शासन आदेशामुळे अधिसंख्य अधिकारी /कर्मचाऱ्यांची ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह) संस्थेच्या निवेदनानुसार लोकप्रतिनिधीनी शासनाकडे शुद्धीपत्रक निर्गमित करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २१ डिसेंबर, २०१९ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४.२ नुसार अद्यापही शिक्षण विभागासह अन्य विभागातील सेवासमाप्त कर्मचाऱ्यांना ‘अधिसंख्य ‘ पदाच्या नियुक्त्या देण्यात आल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अधिसंख्य पदावर वर्ग करण्यात आलेले अधिकारी आणि कर्मचारी यांना सेवाविषयक व सेवानिवृत्तीविषयक लाभ व शुध्दीपत्रक काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.
(२) अधिसंख्य कर्मचाऱ्यांच्या सेवेत १ दिवसाचा तांत्रिक खंड देण्याबाबतच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने शुध्दीपत्रक निर्गमित करण्याकरीता दिनांक १२/०२/२०२४ चे निवेदन शासनास प्राप्त झाले आहे.
(३) सर्व प्रशासकीय विभागांकडून प्राप्त माहितीनुसार दिनांक २१/१२/२०१९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४.२ नुसार सेवा समाप्त कर्मचाऱ्यांना अधिसंख्य पदावर नियुक्ती देण्यात आलेली आहे.
(४) धोरणात्मक निर्णयाबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या आझाद नगर भागातील आरक्षित जागेतील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्याबाबत

**(१४) * २३११५ श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाईंदर येथील आझाद नगर भागातील आरक्षणाच्या मालकी जागेत झालेल्या बेकायदा गोदाम व झोपडपट्टींना आग लागून एका व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागेवरील अनधिकृत बांधकामे लवकरात लवकर निष्कासित करण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधींनी महानगरपालिकेकडे केली असून महानगरपालिकेच्या काही अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने असे अनेक गैरप्रकार होत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जागा शहरातील मध्यवर्ती भागात असल्याने महानगरपालिकेकडून जागा ताब्यात घेण्यासाठी विकासक व जमीन मालकास कोट्यवधी रुपयांचा मोबदला टीडीआरद्वारे देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मीरा-भाईंदर महानगरपालिकेच्या जागेतील अनधिकृत बांधकामास सहाय्य करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मिरा-भाईंदर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्र. १२२ (खेळाचे मैदान व सामाजिक वनीकरण) या आरक्षणाचे क्षेत्रापैकी महानगरपालिकेच्या ताब्यातील मोकळ्या जागेत बाजूच्या वस्तीतील नागरिक भंगार साहित्य ठेवत असल्याने त्या ठिकाणी आग लागुन एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक २८/०२/२०२४ रोजी घडली, हे खरे आहे.
(२) अशा स्वरुपाच्या मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडून महानगरपालिका प्रशासनास प्राप्त झाली आहे. तसेच, महानगरपालिकेमार्फत सदरचे भंगार साहित्याच्या अतिक्रमणावर वेळोवेळी कारवाई करुन जागा मोकळी करण्यात येते, ही वस्तुस्थिती आहे.
(३) महानगरपालिकेने जमिनमालक / अधिकारपत्र धारक यांस जमिनीचा मोबदला टीडीआर (TDR) च्या स्वरुपात देऊन आरक्षणामधील जागा नियमानुसार ताब्यात घेतलेली आहे.
(४) सदर आगीची घटना घडल्यानंतर महानगरपालिकेने तातडीने सदरच्या परिसरातील उर्वरित भंगार साहित्याच्या अतिक्रमणांवर कारवाई करुन जागा मोकळी करुन तेथे कुंपण बांधण्याचे काम सुरु केले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोल्हापूर जिल्ह्यातील दिव्यांग शाळांचे वेतनेतर अनुदान अदा करण्याबाबत

**(१५) * २३४०६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील १८ दिव्यांग शाळांचे १२ कोटी ६ लाख रुपयांचे वेतनेतर अनुदान गत तीन वर्षांपासून प्रलंबित असून अनुदानाअभावी या शाळांची आर्थिक स्थिती बिकट झाली असून दिव्यांग विद्यार्थ्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने दिव्यांग शाळांचे प्रलंबित वेतनेतर अनुदान तातडीने अदा करण्याकरीता निधीची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

एकूण १८ शाळापैकी १२ शाळांचे २०२१-२२ मध्ये प्राप्त झालेल्या तरतुदीमधून एकूण रुपये १,२४,४६,५६४/- इतकी रक्कम अदा करण्यात आली आहे. उर्वरीत प्रस्तावांबाबत कार्यवाही सुरू आहे.
(२) वित्त विभागाच्या दिनांक ०१ एप्रिल, २०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सन २०२३-२४ मध्ये ३१-सहायक अनुदान (वेतनेतर) वितरीत करतांना वित विभागाची मान्यता घेण्याचे निदेश देण्यात आले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर परिपत्रकान्वये सहायक अनुदाने वेतनेतर मंजूर करण्यापूर्वी त्यांचेकडून पूर्वी वितरीत केलेल्या अनुदानाच्या खर्चाची उपयोगिता प्रमाणपत्रे विभागाने प्राप्त करावीत असे निदेश देण्यात आले आहेत. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाकडून सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात वितरीत सहायक अनुदानाचे उपयोगिता प्रमाणपत्र मागविण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या विशेष शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत

**(१६) * २३००६ श्री.कपिल पाटील, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेष शाळेतील अंध, कर्णबधीर, अपंग शाळेतील शिक्षकांना सन २०१९ पासून सातव्या वेतन आयोगाची थकबाकी, विशेष शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती, मुंबई, पालघर विभागातील विशेष शाळांना पूर्णवेळ अधिकारी आणि कर्मचारी, सेवानिवृत्त शिक्षकांना निवृत्तीवेतन, उपदान इत्यादी मागण्या प्रलंबित असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या परिपत्रकान्वये फरकाची रक्कम शाळानिहाय समाजकल्याण विभागामार्फत आयुक्त, पुणे व सामाजिक न्याय विभागाकडे पाठविली असून, सर्व शाळांनी फरकाच्या रकमेचा तक्ता समाजकल्याण अधिकारी, ठाणे यांच्याकडे पाठविला असूनही अद्यापपर्यंत त्यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हा कार्यालयाकडून वेतन आयोगाचा फरक हा यापूर्वी जिल्हानिहाय अदा करण्यात येत होता, परंतु दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार यापुढे ही रक्कम मंत्रालयीन विभागाच्याा स्तरावरून अदा करण्यात येण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, दिनांक २३ एप्रिल, २०२१ आणि दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयात नमुद अटी व शर्तीच्या तपासणीद्वारे राज्यातील कर्णबधीर प्रवर्गाच्या विशेष शाळांना, विशेष शाळेतील अंध, कर्णबधीर, अपंग शिक्षकांना सातव्या वेतन आयोगाची थकबाकी तसेच सेवानिवृत्त शिक्षकांना निवृत्तीवेतन व उपदान अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

ठाणे जिल्ह्यामध्ये दिव्यांगांच्या २६ शाळा/कर्मशाळा आहेत. यापैकी २० शाळा/कर्मशाळांना प्राप्त प्रस्तावानुसार रोखीने अदा करावयाचे सातवा वेतन आयोगाचे अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे. उर्वरित शाळा/कर्मशाळांना वेतन अनुदान मंजूर करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

दिनांक १३ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन परिपत्रकाअन्वये सातव्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम विहित कार्यपध्दतीने शासनातर्फे आयुक्तांना व आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांचेमार्फत जिल्हा कार्यालयास व जिल्हा कार्यालयामार्फत समाजसेवार्थ प्रणालीव्दारे अदा करण्यात येतात.

(४) दिनांक २३ एप्रिल, २०२१ आणि ३० सप्टेंबर, २०२२ रोजीच्या शासन निर्णयात नमुद अटी व शर्तीच्या तपासणी करून थकबाकी अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाची नाथजल योजना पुन्हा सुरु करणेबाबत

**(१७) * २३३७४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे : तारांकित प्रश्न क्रमांक २१२८२ ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या प्रवाशांना अर्धा आणि एक लिटर बाटलीबंद पाणी स्वस्त दरात मिळावे व महामंडळाला उत्पन्नाचा एक नवा स्रोत निर्माण होण्यासाठी महामंडळाने सुरू केलेला "नाथजल" प्रकल्प अडत/कमिशन कमी मिळत असल्याने अधिकाऱ्यांनी बंद पाडला असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुर्तीजापूर (जि.अकोला) तालुक्यातील तसेच अन्य जिल्ह्यांतील बस स्थानकांवरील नादुरुस्त असलेली थंड पाण्याची मशिन तातडीने दुरुस्त करुन बस स्थानकांवरील प्रवाशांना स्वच्छ व शुध्द पाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, बस स्थानकांत केवळ नाथजल या पाण्याचीच विक्री करण्याचे लेखी आदेश असताना त्याची अंमलबजावणी न करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) व (३) रा.प. मुर्तिजापुर बसस्थानकावर नाथजल पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच सेवाभावी संस्थेकडून प्रवाशांना थंड पाणी मिळण्याकरीता आरओ मशिन कार्यान्वित आहे.

रा.प.बसस्थानकांवर नाथजल पाणी बाटलीची विक्री चढया दराने किंवा नाथजल पाणी बाटलीऐवजी इतर नाममुद्रेचे पाणी बाटली विक्री करीत असल्याची बाब रा.प. महामंडळाच्या निदर्शनास आल्यास, संबंधित आस्थापनाधारकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परराज्यातून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन आलेल्या वाहनांच्या नोंदणी बनावट कागदपत्रांच्या आधारे करण्यात आल्याबाबत

**(१८) * २३०१६ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.जयंत पाटील, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.प्रवीण दटके, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परराज्यातून ना-हरकत प्रमाणपत्र (एनओसी) घेऊन प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी (आरटीओ) येथील कार्यालयात १०० हून अधिक बसेस आणि अन्य वाहनांची बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बँकांनी लिलावात काढलेली, भंगारातील आणि आयुर्मान संपत आलेली वाहने खरेदी करून मुंबईसह अन्य विभागातील आरटीओ कार्यालयांमध्ये बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी केली जात असून, यापैकी बहुतांश वाहनांची मूळ कागदपत्रे गहाळ झाल्याने वाहनांच्या नोंदणीसाठी वापरण्यात येणाऱ्या 'वाहन' या संगणकीय यंत्रणेवर देखील ती उपलब्ध नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, आरटीओ कार्यालयामधील लिपिकांनी ८० हून अधिक बसेसची बनावट नोंदणी राज्यातील इतर आरटीओ कार्यालयांमध्ये केल्याची बाब आरटीओ प्रशासनाच्या तपासात निदर्शनास आली असून, सानपाडा पोलीस ठाणे यांनी पकडलेल्या ५ ते ६ बसेसची वाशी आरटीओ कार्यालयातून बनावट कागदपत्रांच्या आधारे नोंदणी झाल्याचे तसेच वसई आरटीओमधून परराज्यातून आलेल्या सुमारे ६० बस व ट्रक यांची बोगस नोंदणी झाल्याचे परिवहन विभागाच्या तपासात निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने परराज्यातून ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन आलेल्या तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे वाहनांची नोंदणी करणाऱ्या संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर परिवहन आयुक्त यांच्यामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी राज्यातील वाहन नोंदणी प्रक्रिया अधिक पारदर्शी करण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) येथे तेलंगणा राज्याचे ना-हरकत प्रमाणपत्र नसताना बनावट कागदपत्रांच्या आधारे एकूण ८६ वाहनांची पुर्ननोंदणी केल्याची बाब माहे जानेवारी, २०२४ मध्ये निदर्शनास आली आहे. तसेच, या आशयाची बातमी लोकसत्ता या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली होती.
(२) परिवहन आयुक्त कार्यालयाच्या अहवालानुसार, बँकानी लिलावात काढलेली किंवा भंगारातील आणि आयुर्मान संपत आलेली आहे किंवा कसे याबाबत परिवहन कार्यलयातील कार्यालयीन अभिलेख्यात माहिती उपलब्ध नाही.

तसेच, प्रादेशिक परिवहन कार्यालय, अंधेरी, मुंबई (पश्चिम) येथे बनावट कागदपत्रांच्या आधारे "वाहन ४.०" या संगणक प्रणालीच्या अभिलेखावर पुर्ननोंदणी केलेल्या वाहनांची मूळ कागदपत्रे वा त्या कागदपत्रांच्या स्कॅनिंग प्रती तसेच संगणकीय अभिलेखावर दिसून येत नाहीत.

त्यानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (पश्चिम) यांनी सदर कागदपत्रे गहाळ झाल्याबाबत रजि.नोंद क्र.११/२०२४, दिनांक ०३/०१/२०२४ अन्वये व गहाळ नोंदवही क्र.१०४/२०२४, दिनांक ०२/०२/२०२४ अन्वये अंबोली पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

याप्रकरणी मिरा रोड पोलीस ठाणे, गु.र.क्र.४०६/२०२३, भा.द.वि.स.४२०, ४६५, ४६८, ४७१, ३४ अन्वये एकूण १२ दोषी व्यक्तींवर गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.
(३) होय.
(४), (५) व (६) परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत प्रादेशिक परिवहन अधिकारी, नाशिक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपासणी पथक गठीत केले असून त्यांच्या मार्फत चौकशी सुरू आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, मुंबई (पश्चिम) येथील ४ कर्मचारी निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी प्रस्तावित केली आहे.

उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, नवी मुंबई यांच्या वायुवेग पथकामार्फत अरुणाचल प्रदेश येथे नोंदणीकृत असणाऱ्या ४ वाहनांच्या कागदपत्रांमध्ये व वाहनांचा चेसिस क्रमांक, इंजिन क्रमांक यामध्ये अनियमितता दिसून आल्या प्रकरणी सानपाडा पोलीस ठाणे, नवी मुंबई येथे गु.र.क्र. ०१३१/२०२३ दिनांक २१/०८/२०२३ नुसार गुन्हा दाखल केला आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई येथे ३६ बसेस व २४ ट्रक अशी एकूण ६० वाहने नोंदणी झाल्याचे आढळून आले आहे. सदर प्रकरणी विरार पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद क्र.११४५/२०२३, दिनांक १३/१२/२०२३ अन्वये गुन्हा दाखल केला आहे. तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वसई येथे नोंदणी झालेल्या ६० वाहन धारकांविरुध्द विरार पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद असून, त्या कार्यालयामार्फत याप्रकरणी ६० वाहनांची नोंदणी रद्द केली आहे.

प्रादेशिक परिवहन कार्यालय, अमरावती येथील प्रकरणी विशेष तपास पथक, गुन्हे शाखा नवी मुंबई यांनी एपीएमसी पोलीस स्टेशन येथे गुन्हा क्र.७२/२०२४ अंतर्गत कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४१३, २०१, ४०१, १२० ब भां.द.वि. नुसार गून्हा दाखल करण्यात आला आहे. दोषी वाहनांविरुध्द नोंदणी रद्द करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच या प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कारवाईची प्रक्रिया सुरु आहे.

वाहन नोंदणी प्रक्रीयेच्या अनुषंगाने परिवहन आयुक्त कार्यालयाकडून वेळोवेळी मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळामध्ये अद्ययावत बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत

**(१९) * २३७९५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताब्यातील हजारो बसेस नादुरुस्त असून महामंडळाने उन्हाळी हंगामात प्रवासी संख्येत वाढ होत असतानाही अपेक्षित गाड्या न वाढविल्याने मूळ गावी जाणाऱ्या प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून प्रवाशांना होणाऱ्या गैरसोयी बरोबरच त्यांना आर्थिक भारही सहन करावा लागत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने ज्येष्ठ नागरिक व महिला यांच्यासाठी एसटीच्या तिकीट दरात सवलत देण्याच्या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यामुळे प्रवाशांची गर्दी वाढली असून महामंडळात सन २०२४ या वर्षात ३ हजार ४९५ एसटी बसेस सेवेत दाखल करण्यासाठी शासनाने मंजुरी दिली आहे तसेच महामंडळातर्फे सदर वर्षात ५१५० ई-बसेस भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, करमाळा हे सोलापुर, पुणे, अहमदनगर, धाराशिव या जिल्ह्यांच्या मध्यवर्ती असलेले बसस्थानक असून एसटीच्या २५० पेक्षा अधिक फेऱ्या तिथून होत असतात, परंतु सदर आगारात १०० बसेसची आवश्यकता असताना केवळ ६५ बसेस कार्यरत असून त्यातील बहुतांश बस नादुरुस्त आहेत

तसेच गत १० वर्षांपासून करमाळा आगाराला एकही नवीन बस मिळालेली नाही, राज्यातील विविध आगारांमध्ये वापरुन झालेल्या बस याठिकाणी देण्यात आलेल्या असल्याने त्या प्रवासादरम्यान रस्त्यावर बंद पडत असून याचा नाहक त्रास ज्येष्ठ नागरिक, रुग्ण, लहान मुले, महिला, विद्यार्थी यांना होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कळमनुरी (जि.हिंगोली) येथील सर्वात जास्त उत्पन्न देणाऱ्या बस आगारातील अनेक गाड्या जुन्या व खिळखिळया झाल्यामुळे ४३ बसेसवर आगार प्रशासनाला कारभार चालवावा लागत असून महामंडळाच्या दुर्लक्षामुळे नवीन बसेस न दिल्यामुळे जुन्या बस गाड्या नादुरुस्त झाल्याने शहरासह ग्रामीण भागातील बस नियोजन व्यवस्थीत नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या ताफ्यात एकूण १५ हजार ७५२ बसेस सेवेत असून त्यापैकी दररोज सरासरी १२ हजार ६०० बसेस कार्यरत आहेत, अडीच ते तीन हजार बस कोणत्या ना कोणत्या कारणामुळे आगारात किंवा विभागीय कार्यशाळेमध्ये बंद अवस्थेत असल्यामुळे यासंदर्भात शासनाने निर्णय घेऊन परिवर्तनच्या नव्या एस.टी बसेस उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, महामंडळाने विभागीय स्तरावर १ हजार २९५ तयार बस भाडेतत्वावर घेण्याची तयारी केली याची निविदा अंतिम टप्प्यात आली असूनही याला अद्याप मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास राज्यातील नागरिकांना उत्तम बस वाहतूक सेवा पुरविण्यासाठी महामंडळाच्या ताफ्यात तातडीने नवीन अद्ययावत एसटी बसेस आणण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपायोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) होय.

(३) व (४) नाही.

रा.प.करमाळा आगारात पुरेशा वाहनांने ६८ नियते तसेच रा. प.कळमनूरी आगारात ३७ नियतांद्वारे वाहतूक केली जाते. तसेच वाहनांची स्थिती उत्तम ठेण्याकरीता नियतकालीक कार्यक्रमानुसार वाहनांची नियतकालीक देखभाल व आवश्यक ती दुरुस्ती करण्यात येते. त्याचप्रमाणे आयुर्मान पूर्ण झालेली वाहने मोडीत काढण्यात आलेली आहेत.

(५) रा.प. महामंडळाच्या वाहन ताफ्यात तातडीने २२०० नवीन अत्याधुनिक BS-६ बनावटीची तयार वाहने खरेदी करणेकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, पुढील कार्यवाही सुरु आहे.

(६) १२९५ बसेस घेण्याबाबतचा संचालक मंडळाचा ठराव मंजूर झाला असून १२३० बसेस घेण्याबाबत निविदा प्रक्रीया प्रस्तावित आहे.

(७) राज्यातील नागरिकांना उत्तम बस वाहतूक सेवा पुरविण्यासाठी रा.प.महामंडळाच्या ताफ्यात ५१५० ई-बसेस भाडेतत्वावर घेण्यात येणार आहेत. सदर बसेस घेण्याकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून, बसेस टप्याटप्याने दाखल होत आहेत. तसेच भाडेतत्वावरील १२३० साध्या बसेस घेणेबाबत कार्यवाही सुरू आहे.

तसेच महामंडळाच्या वाहन ताफ्यात तातडीने २२०० नवीन अत्याधुनिक BS-६ बनावटीची तयार वाहने खरेदी करणेकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातील प्रकल्पबाधितांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२०) * २३५५३ श्री.रमेशदादा पाटील, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रवीण दटके, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रसाद लाड, श्री.गोपिचंद पडळकर, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळातील प्रकल्पबाधितांनी त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी सिडको भवन समोर बेमुदत साखळी उपोषण केले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ समितीच्या माध्यमातून सदर उपोषण करण्यात येत असल्याने यासंदर्भात सिडको व्यवस्थापकीय संचालकांना मागण्यांचे स्वयंस्पष्ट निवेदन देण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रकल्प बाधितांच्या विविध प्रश्नांवर गत चार-पाच वर्षे सातत्याने विविध आंदोलने होऊनही या प्रकल्पग्रस्तांचा प्रश्न अद्याप प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या विमानतळाला दि. बा.पाटील यांचे नाव द्यावे व सिडकोने नाकारलेल्या बांधकामांना सरसकट पूर्ण पॅकेज लागू करावे, मच्छीमारांना २०१३ च्या कायद्याप्रमाणे नुकसान भरपाई द्यावी, १८ वर्षावरील सर्व युवक-युवतींना प्रशिक्षण देऊन प्रकल्पग्रस्त दाखले देऊन नोकरी उपलब्ध करून देण्यात याव्यात, चिंचपाडा, तलावपाळीसाठी तिप्पट भूखंड व पूर्ण आर्थिक पॅकेज लागू करावे, ज्यांची घरे तोडली त्यांना पाचशे रुपये वाढीव भत्ता व घर भाडे भत्ता देण्यात यावा इत्यादी मागण्या शासनाकडे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्रकल्पबाधितांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३), (४) व (५) नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कमिटी संलग्न अखिल भारतीय किसान सभा यांच्या दिनांक ३/०८/२०२३ च्या निवेदनाद्वारे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प बाधितांच्या प्रलंबित मागण्या सादर केल्या आहेत. तसेच उक्त संस्थेने आयोजित साखळी उपोषणादरम्यान केलेल्या मागण्या विचारात घेता, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पग्रस्तांना शासन निर्णय दिनांक १/०३/२०१४ व दिनांक २८/०५/२०१४ मधील तरतुदीनुसार भूखंड वाटप व इतर लाभ देण्यात येत आहेत. प्रकल्पग्रस्तांसाठी सिडको महामंडळामार्फत प्रशिक्षण आयोजित करण्यात येत असून प्रकल्पग्रस्त दाखले देण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे. विमानतळ गाभा क्षेत्राबाहेरील बांधकाम धारकांना सप्टेंबर

२०१३ ची स्थिती विचारात घेऊन लाभ देण्यात आले आहेत. प्रकल्पग्रस्तांना विशेष प्रोत्साहन भत्ता व १८ महिने घरभाडे हे लाभ देण्यात आले असून कालावधी वाढवून देण्याबाबत सिडकोने सादर केलेला प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. परंतु त्यावर अंतिम निर्णय झालेला नाही. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास दिनांक बा.पाटील यांचे नाव देण्यासंदर्भातील प्रस्ताव केंद्र शासनाच्या नागरी विमान मंत्रालयाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील कोलवॉशरीजमुळे प्रदूषणात वाढ होत असल्याबाबत

**(२१) * २३४७२ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या संख्येने कोलवॉशरीज असून सर्वात जास्त कोल वॉशरीज पडोली ते घुग्घूस दरम्यान असल्यामुळे या कोलवॉशरीजमधील प्रदुषणाने शेतपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांकडून या कोलवॉशरीजची पाहणी केली गेली असून त्यात त्रुटी निदर्शनास आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोलवॉशरीजमुळे शेतपिकांचे नुकसान होत असल्याने शेतकऱ्यांनी अनेक तक्रारी केल्या असून या कोलवॉशरीजवर कोणतीही कारवाई केली जात नसल्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, शेतपिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाने केलेल्या पाहणीत निदर्शनास आलेल्या त्रुटींची पूर्तता करुन प्रदूषण टाळण्यासाठी कोलवॉशरीजवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन परिसरातील कोलवॉशरीजमधील प्रदूषणामुळे परिसरातील शेतपिकांचे नुकसान झाल्याबाबतची तक्रार जिल्हा कृषी अधिकारी, चंद्रपूर तसेच, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झालेली नाही.

- महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत प्रश्नाधीन परिसरातील कोलवॉशरीज उद्योगांची दिनांक ३१/०५/२०२४, दिनांक ०१/०६/२०२४ व दिनांक ०२/०६/२०२४ रोजी नियमित पाहणी करण्यात आली होती.
- सदर पाहणीदरम्यान दोषी आढ़ळून आलेल्या मे. एसीबी (इंडीया) लि., पांढरपौनी व महामिनरल माईनिंग ॲण्ड बेनिफिकेशन प्रा. लि., ऊसगाव या उद्योगांना प्रस्तावित निर्देश दिले आहेत. तसेच मे. एन. एम. ग्लोबल मर्केंटाईल प्रा. लि.,ता.राजुरा या उद्योगास दिनांक ०२/०६/२०२४ रोजी अंतरीम निर्देश देवून रुपये ०५ लाख बँक हमी जप्त करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त उपायुक्तांना कंत्राटी पध्दतीने नियमबाह्य मुदतवाढ दिल्याबाबत

**(२२) * २२९६२ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील सेवानिवृत्त उपायुक्तांना एका वर्षासाठी कंत्राटी पध्दतीने उपायुक्त (पायाभूत सुविधा) या पदी मान्यता दिली असल्याचे पत्र नगरविकास विभागाने दिनांक १६ मार्च, २०२४ रोजी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना पाठविले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतून सेवानिवृत्त झालेल्या काही अधिकाऱ्यांना आजमितीपर्यंत 'विशेष कार्यकारी अधिकारी' म्हणून काही काळ मुदतवाढ देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित सेवानिवृत्त उपायुक्तांना मात्र नियम डावलून तसेच अटी शिथिल करून थेट सेवा कालावधी वाढवून देण्यात आल्याने पायाभूत सुविधा विभागात पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या पात्र आणि अनुभवी अधिकारी यांच्यावर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित सेवानिवृत्त उपायुक्तांना नियमबाह्य पध्दतीने वाढवून देण्यात आलेला थेट सेवा कालावधी रद्द करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) व (४) श्री.उल्हास महाले, सेवानिवृत्त उपायुक्त यांची बृहन्मुंबई महानगरपालिकेतील "उप आयुक्त (पायाभूत सुविधा)", या रिक्त पदी सेवा करार पध्दतीने प्रथमत: १ वर्षासाठी नियुक्ती करण्यास मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने दिनांक १३/०२/२०२४ च्या पत्रान्वये शासनास सादर केला होता.बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदर प्रस्तावास दिनांक १६/०३/२०२४ च्या शासन पत्रान्वये शासन मान्यता देण्यात आली असून, सदर प्रकरणी विहित तरतुदींनुसार आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्याबाबत आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांना कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या दादर (मुंबई) येथील स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२३) * २२९०५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २०४५६ ला दिनांक २६ जुलै, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक इंदु मिल, दादर (मुंबई) येथे उभारण्याचा निर्णय घेतल्यानंतर, सन २०१५ मध्ये मा.पंतप्रधान यांचे हस्ते स्मारकाच्या कामाचे भुमिपूजन करण्यात आले असून, स्मारकाचे काम तीन वर्षांमध्ये पूर्ण होणे अपेक्षित असताना आतापर्यंत स्मारकाचे स्थापत्य काम पूर्ण झाल्याचे तसेच पुतळयाचे काम लवकरच सुरु करण्यात येणार असल्याचे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी

(एमएमआरडीए) सांगितले असल्याचे दिनांक १४ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री व विद्यमान मा.कृषी मंत्री यांनी स्मारकाचे काम माहे डिसेंबर, २०२४ मध्ये पूर्ण होईल असे सर्व माध्यमांसमोर सांगितले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्याबरोबरच इतर समाप्तीचे काम बाकी असून ते पूर्ण होण्यास लागणारा कालावधी विचारात घेता, स्मारकाचे काम माहे डिसेंबर, २०२५ पर्यंत पूर्ण होण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) पुतळयाचे काम पूर्ण करण्यासाठी शिल्पकार श्री.राम सुतार यांना सदर कामासाठी मेसर्स शापूरजी पालनजी आणि कं. लि. यांच्याकडून नियुक्त करण्यात आले आहे व उर्वरीत कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रकल्प सल्लागाराकडुन नियोजन करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील बोगस पॅथॉलॉजी प्रयोगशाळांच्या माध्यमातून नागरिकांची होणारी फसवणूक रोखण्याबाबत

**(२४) * २३१४३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे सन २०१९ पासून आजतागायत अधिकृत पॅथोलॉजी प्रयोगशाळांच्या संख्येची नोंद नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रयोगशाळांची नोंद नसल्यामुळे अवैध प्रयोगशाळांची संख्या वाढली असून त्यात कोणत्या चाचण्यांसाठी किती पैसे द्यावेत याची निश्चित अशी नियमावली ठरविली नसल्याने रुग्णांची अनेकदा फसवणूक होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाकडून योग्य धोरण निश्चिती नसल्यामुळे वर्षानुवर्षे चालत असलेल्या बोगस प्रयोगशाळा नियमित सुरु असून केवळ पॅथोलॉजीस्टचे नाव आणि सही शिक्का यांचा बेकायदा वापर होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, मुंबई सारख्या शहरात नागरिकांची बोगस पॅथोलॉजी प्रयोगशाळेच्या माध्यमातून होत असलेली फसवणूक रोखण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ मधील तरतुदीनुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेंतर्गत येणाऱ्या खाजगी पॅथॉलॉजी लॅबची नोंदणी करण्यासंदर्भातील तरतूद उपलब्ध नाही.
(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) नगरपंचायतअंतर्गत पाणीपुरवठा योजनेवरील स्थगिती उठविण्याबाबत

**(२५) * २३७३८ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुक्ताईनगर नगरपंचायत (जि.जळगाव) अंतर्गत केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ६ मार्च, २०२३ रोजी ३२ कोटी ३४ लक्ष रूपयांच्या कामाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर योजनेस दिनांक ८ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास शासनाचे पत्रान्वये स्थगिती देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नगरपंचायतीचे नवनिर्मितीनंतर नवीन निकषानुसार नागरिकांना परिपुर्ण पाणीपुरवठा होणे आवश्यक असताना योजनेस स्थगिती देण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, सदर योजनेस दिलेली स्थगिती उठवून मुक्ताईनगर नगरपंचायत (जि.जळगाव) अंतर्गत केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियान अंतर्गत मुक्ताईनगर नगरपंचायतच्या रुपये ३२.१४ कोटी किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पास दिनांक ०६ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आलेली आहे.
या प्रकल्पाचा उद्भव पूर्णा नदीतून आहे व पूर्णा नदीतून मुक्ताईनगर व ८१ गाव पाणीपुरवठा योजनांतून पावसाळयात चुनखडीयुक्त गाळ घेऊन उपसा पंप जाम होऊन ३ महिने दूषित गाळ मिश्रित व अशुध्द पाणीपुरवठा होत असल्याचा पूर्वानुभव पाहता सदर अडचणीस अनुसरून सुधारित सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून प्रकल्प राबविण्याची विनंती सन्माननीय लोकप्रतिनिधींनी शासनास केली होती. सदर प्रकरणी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, नाशिक यांना अहवाल सादर करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या व तोपर्यंत प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेस स्थगिती देण्यात आली होती. मुख्य अभियंत्यांनी त्यांच्या अहवालात सदर उद्भवापासून उचलण्यात येणाऱ्या पाण्यातील गढूळता कमी करण्यासाठी प्री-सेटलिंग टँकचा वापर करून हाच उद्भव वापरणे शक्य असल्याचे अभिप्राय दिले आहेत. त्याचप्रमाणे सन्माननीय लोकप्रतिनिधींनी देखील या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेवरील स्थगिती उठविण्याची शासनास विनंती केलेली आहे. सबब, या प्रकल्पाच्या निविदा प्रक्रियेस दिलेली स्थगिती उठविली असून मुख्याधिकारी, मुक्ताईनगर नगरपंचायत यांना प्रकल्पाची निविदा प्रक्रिया राबविण्याबाबत सूचित केले आहे.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी परिचर नेमण्याबाबत

**(२६) * २३८२८ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासनाने सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता प्रशासनाकडून २४ तासांसाठी आणखी १५५६ परिचर (अटेंडंट) नेमले जाणार आहेत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिका शाळांमध्ये वैयक्तीक हल्ले, कोणत्याही प्रकारची तोडफोड, संगणक, महागडे फर्निचर यासारख्या वस्तूंची चोरी रोखणे तसेच विद्यार्थ्यांची सुरक्षितता तसेच शाळेच्या इमारतीच्या प्रवेशद्वाराचे नियंत्रण याकडे ते लक्ष ठेवणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने मुंबईतील महानगरपालिकेच्या शाळांची सुरक्षा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने सदर शाळांमध्ये १५५६ परिचर नियुक्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळांची सुरक्षा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने इमारतींच्या वाढीव सुरक्षेसाठी लागणारे वाढीव ७०४ परिचर, बंद मोकळे / तोडलेले / भूखंडासाठी लागणारे ५०७, मूळचे वाढीव १३१ व रजा राखीव २१४ असे एकूण १५५६ परिचर (ॲटेंडन्ट) नियुक्ती करण्याबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता मिळाली असून निविदा प्रक्रियेसाठी पुढील कार्यवाही महानगरपालिकेच्या स्तरावर सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिका तसेच नवी मुंबई महानगरपालिकेच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम बँक खात्यात जमा करण्याबाबत

**(२७) * २३१५३ श्री.सचिन अहिर, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची रुपये २२८ कोटींची रक्कम संबंधित कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा केली जात नसल्याने सदरची रक्कम तात्काळ जमा करण्यात यावी असे आदेश विभागीय आयुक्तांनी माहे जानेवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेस दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिकेने कोरोना काळात कंत्राटी कामगारांची १८ महिन्यांची रक्कम त्यांच्या भविष्य निर्वाह निधीत जमा केली नसून सदर कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम जमा न करण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील १५ हजारांहून अधिक कर्मचाऱ्यांची व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे वेतन रोखल्याने सफाई कामगारांच्या कुटुबियांना आर्थिक संकटाना सामोरे जावे लागत असल्याने सफाई कामगारांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला दिला असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील तसेच नवी मुंबई महानगरपालिकेतील कंत्राटी सफाई कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम तात्काळ त्यांच्या खात्यात जमा करण्याबाबत तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कर्मचाऱ्यांना तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना त्यांचे रोखलेले थकीत वेतन अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागात कोरोना काळातील व सद्य:स्थितीत एकूण २९६६ दैनंदिन साफसफाई कंत्राटी कामगार आहेत. सदर कंत्राटी कामगारांच्या उपस्थितीनुसार त्यांचे वेतन व इतर भत्ते त्यांच्या खाती जमा करण्यात आले आहेत. तसेच भविष्य निर्वाह निधी इ. चा भरणा करण्यात आलेला आहे.
(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कामगार-कर्मचाऱ्यांचे वेतन कापल्यामुळे कामगार-कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचे रुपांतर कोणत्याही क्षणी आंदोलनात होण्याची शक्यता नाकारता येत नाही अशा आशयाचे म्युनिसिपल मजदूर युनियन, मुंबई यांचे दिनांक २७/०३/२०२४ रोजीचे पत्र बृहन्मुंबई महानगरपालिकेला प्राप्त झाले आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या घनकचरा विभागातील कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची अंशत: रक्कम कंत्राटी संस्थांनी कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेकडे जमा केली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या कंत्राटी सफाई कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीच्या रकमेबाबत विभागीय आयुक्तांनी केलेले परिगणन अवास्तविक असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ५५३/२०२४ दाखल केली आहे. मा.न्यायालयाने सदर प्रकरणाच्या पुढील सुनावणीपर्यंत कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने बृहन्मुंबई महानगरपालिकेविरुध्द कुठलीही सक्तीची कारवाई करु नये, असे अंतरिम आदेश पारित केले आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या १५ हजारांहून अधिक कर्मचारी व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे पॅनकार्ड आधारकार्डशी लिंक नसल्यामुळे त्यांच्या माहे मार्च, २०२४ करीता मासिक वेतन आणि मासिक निवृत्त वेतनाची आकारणी केल्यानंतर, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांनी जारी केलेल्या अधिसूचना क्र. ३/२०२३, दिनांक २८/०३/२०२३ अन्वये आयकर कलम २०६एए नुसार २०% दराने लागू असलेली दंडात्मक आयकर वसुली त्यांच्या वेतन आणि निवृत्ती वेतनातून करण्यात आली आहे. त्यापैकी, ६८००

कार्यरत कामगार / कर्मचारी हे घनकचरा विभागातील असून त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक संकटांना सामोरे जावे लागू नये याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत त्यांना रुपये १५,०००/- इतक्या आगाऊ रकमेचे अधिदान त्वरीत अदा करण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्या पूर्ण करण्याबाबत

**(२८) * २३३३३ श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील कंत्राटी कामगारांनी आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन केले असल्याची बाब माहे मार्च, २०२३ च्या दुसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी महानगरपालिका क्षेत्रातील कंत्राटी कामगार, पाईपलाईन निगा व दुरुस्ती, बोरवेल कामगार, फिल्टर व वॉलमनच्या समस्यांचे निराकरण इ. मागण्यांची पूर्तता करण्याच्या दृष्टीने अनेक वेळा पत्रव्यवहार करून व निवेदन देऊनही अद्यापपर्यंत प्रशासनाने कोणतीही कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कंत्राटी कामगारांनी केलेल्या मागण्या पुर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेने कळविल्यानुसार पाणीपुरवठा विभागातील कंत्राटी कामगारांनी त्यांच्या मागण्यांसाठी माहे मे, २०२३ व माहे मार्च, २०२४ मध्ये आंदोलन केले होते, ही वस्तुस्थिती आहे.
(२) व (३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका क्षेत्रात पाणीपुरठा विभागामध्ये पाईपलाईन निगा व दुरुस्ती व्हॉलमन सेवा इत्यादी कामाकरीता ठेकेदारामार्फत कामगार पुरवठा करण्यात येते.
सदरहू कंत्राटी कामगारांच्या संघटनांनी केलेल्या निवेदनानुसार महानगरपालिका स्तरावर घेण्यात आलेल्या बैठकीनंतर सर्व कंत्राटी कामगारांना फरकासह किमान वेतन कायद्यान्वये वेतन उक्त ठेकेदाराकडून अदा केले जात असल्याची बाब महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी कृती आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत

**(२९) * २३७१८ डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड शहरातील १८ नाल्यांचे पाणी गोदावरी नदीपात्रात सोडले जात असल्याने प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढले असून, सदर प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने गोदावरी कृती आराखडा तयार केला परंतु त्याची अंमलबजावणी करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने गोदावरी नदीचे (जि.नांदेड) वाढते प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीने सदर आराखड्याची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहेत,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) नांदेड-वाघाळा महानगरपालिका हद्दीमधून गोदावरी नदीमध्ये मिसळणाऱ्या १९ नाल्यांपैकी चुनाल नाल्यावर राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत १० एमएलडी क्षमतेचे सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा उभारण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

- शहरातील सांडपाणी व्यवस्था बळकट करणे आणि गोदावरी नदीस मिळणाऱ्या नाल्याच्या पाण्यावर उपाययोजना करण्यासाठी अमृत २.० योजनेंतर्गत NRAP पाईपलाईनचे काम प्रगतीपथावर आहे.
- नांदेड-वाघाळा महानगरपालिका हद्दीत विविध ठिकाणी एकूण १२ घरगुती सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा (Integrated Compact STP) उभारण्यात येत असून, त्यापैकी ८ सांडपाणी प्रक्रिया संयंत्रणा कार्यान्वित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाहभत्ता तसेच महाविद्यालयांना शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याबाबत

**(३०) * २३६७४ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर : तारांकित प्रश्न क्रमांक २२१६६ ला दिनांक १३ डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या स्वरुपात राज्य शासनाकडून ४० टक्के तर केंद्र शासनाकडून ६० टक्के निधी दिला जातो, त्यानुसार प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क आणि विकास शुल्क हे महाविद्यालयाच्या रकमेमध्ये तसेच निर्वाह भत्ता व शैक्षणिक साहित्याच्या खरेदीकरीता रक्कम विद्यार्थ्यांच्या खात्यात थेट जमा होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या धोरणाप्रमाणे शिक्षण शुल्काची रक्कम थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत असून विद्यार्थी ती रक्कम महाविद्यालयामध्ये अनेकदा जमा करत नसल्याने मोठ्या प्रमाणात शिष्यवृत्तीत अनियमितता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात ९६ शैक्षणिक संस्थांचालकांनी मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये दाखल केलेल्या याचिकेनुसार या शिष्यवृत्तीचा रुपये १५७८ कोटी रुपयांचा निधी

कोषागारामध्ये जमा करण्यात आला असून, या विरोधात मा.सर्वोच्च न्यायालयात निर्णय प्रलंबित असल्यामुळे शिष्यवृत्तीची रक्कम कोषागारामध्ये अडकून आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत राज्य शासनामार्फत केंद्र शासनास दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या पत्रानुसार केंद्र हिस्सा प्रभावीपणे वितरीत करण्याची उपाययोजना प्रस्तावित करुन सदर निधी तात्काळ वितरीत करण्याकरीता करण्यात आलेल्या कार्यवाहीचे स्वरुप काय आहे,
(५) असल्यास, राज्य शासनाचे याबाबतीत नेमके धोरण काय आहे आणि प्रत्येक वर्षी विहीत कालावधीत शिष्यवृत्तीची १०० टक्के रक्कम महाविद्यालय आणि निर्वाह भत्याची रक्कम विद्यार्थ्यांना देण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) राज्य शासनामार्फत देण्यात येणाऱ्या ४० टक्के राज्य हिश्याबाबत अनुसूचितजाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांकरीता हे खरे आहे.
(२) अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांबाबत हे अंशत: खरे असून राज्यशासनाचा ४० टक्के चा हिस्सा डीबीटी पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात अदा करण्यात आला आहे. तसेच केंद्रशासनाकडून थेट विद्यार्थ्यांना देय होणारा ६० टक्के हिस्सा देखील केंद्रशासनामार्फत केंद्र शासनाच्या National Scholarship Portal द्वारे विद्यार्थ्यांच्या बँकखात्यामध्ये अदा करण्यात येत आहे
(३) राज्यातील मोठ्या प्रमाणावर महाविद्यालयांनी केंद्र शासनाच्या सुधारीत मार्गदर्शक सूचनांमधील केंद्र हिश्याच्या वाटपाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे ९६ रिट याचिका दाखल केलेल्या होत्या. सदर न्यायालयीन प्रकरणांमध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी दिनांक ०५/१२/२०२३ रोजी अंतिम आदेश निर्गमित केलेले असून यामध्ये केंद्रशासनाने विहित केलेल्या पध्द्तीनुसारच अदायगीची प्रक्रिया कायम ठेवलेली आहे. त्यानुसार केंद्रशासनामार्फत ६० टक्के केंद्रहिस्सा हा केंद्र शासनाच्या National Scholarship Portal द्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बॅंक खात्यामध्ये अदा करण्यात येत आहे.
(४) याबाबत केंद्रशासन स्तरावरुन मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद यांनी आदेशित केल्याप्रमाणे त्यांचे सुधारीत धोरण कायम ठेवून केंद्रहिस्सा ६० टक्के थेट विद्यार्थ्यांच्या खात्यामध्ये जमा होत आहे.
(५) राज्य शासनामार्फत देण्यात येणारा ४० टक्के राज्य हिस्सा हा प्रचलित पध्दतीनुसार म्हणजेच प्रवेश शुल्क, शिक्षण शुल्क आणि इतर सर्व शुल्क हे महाविद्यालयाच्या बँक खात्यामध्ये तसेच निर्वाहभत्त्याची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्निकृत बँकखात्यामध्ये थेट जमा होणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील दहिसरमधील आनंदनगर येथील वाहतूक पूल व स्कायवॉकचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(३१)** * **२३९८४ श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दहिसर (मुंबई) मधील एन.एल. कॉम्प्लेक्स, रुस्तमजी शाळेजवळ, आनंदनगर येथील वाहतूक पूल व स्कायवॉकचे काम अपूर्ण असून सदरहू कामांच्या खर्चामध्ये कोट्यवधी रुपयांची वाढ झाल्याने उक्त कामे महानगरपालिकेने लवकरात लवकर पूर्ण करावीत अशी मागणी वाहतूक कोंडीने त्रस्त नागरीकांकडून होत असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम वेळेत पूर्ण न केल्याने कामांच्या खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून पुल व स्कायवॉकचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करुन सदर प्रलंबित काम तात्काळ पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय, हे अंशतः खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सदर कंत्राटामधील एकूण ०६ कामे पूर्ण झाली असून आकाशमार्गिकेच्या कामाऐवजी मीठ चौकी जंक्शन येथे मार्वे रोडवर एकेरी वाहतूक पूल बांधण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर कामांच्या खर्चामध्ये रुपये ९,००,६९,१७३/-(नऊ कोटी एकोणसत्तर हजार एकशे त्र्याहत्तर) एवढया रकमेची वाढ झाली असून त्यास प्रशासक, स्थायी समिती ठराव क्र.२१८०, दिनांक २०/०२/२०२४ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे.
(२) सदर कामामध्ये एन.एल. कॉम्प्लेक्स, दहिसर येथील दहिसर नदीवरील ४ वाहतूक पूल, रुस्तमजी शाळेवरील वाहतूक पूल, कांदरपाडा येथील स्मशान भूमी जवळील पूल तसेच कांदिवली (पश्चिम) येथे शताब्दी रुग्णालय जवळ आकाशमार्गिका बांधणे, अशी एकूण ७ कामे अंर्तभूत करण्यात आली होती.

सदर कामांपैकी कांदीवली (प) येथील आकाशमार्गिका बांधण्याचे काम स्थानिक प्रतिनिधी आणि स्थानिक नागरीकांच्या तीव्र विरोधामुळे काम रद्द करण्यात येऊन त्या कामांऐवजी दफ्तरी रोड मालाड (पूर्व) येथे आकाशमार्गिका बांधण्याबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. तथापि, सदर कामाच्या ठिकाणी तसाच विरोध झाल्यामुळे ते काम देखील रद्द करण्यात आले.

मालाड (पश्चिम) येथील मीठ चौकी जंक्शन येथे होणारी वाहतूक कोंडी टाळण्याकरीता सदर ठिकाणी उड्डाणपूल बांधण्याची विनंती स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली होती. त्यानुसार, आकाशमार्गिकेच्या कामाऐवजी मीठ चौकी जंक्शन येथे मार्वे रोडवर एकेरी वाहतूक पूल बांधण्यासाठी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांची दिनांक १७/१२/२०२१ रोजी प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाली असून दिनांक ११/०४/२०२२ पासून सदर काम प्रगतीपथावर आहे.

सदरहू कामे प्रगतीपथावर असताना विविध अडचणी, उदा. अस्तित्वात असलेल्या विविध भूमिगत उपयोगिता सेवा, मेट्रोरेल्वेचा पाया तसेच आकाशमार्गीकेच्या कामाऐवजी उड्डाणपुलाचे बांधकाम करावयाचे असल्यामुळे मूळ कंत्राट खर्चामध्ये वाढ झाली असून त्यास प्रशासक, स्थायी समिती ठराव क्र. २१८०, दिनांक २०/०२/२०२४ अन्वये मंजूरी प्राप्त झाली आहे. सदरहू वाहतूक पुलाचे संपूर्ण काम माहे डिसेंबर, २०२४ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आपला दवाखाना या उपक्रमातील केंद्रात वैद्यकीय अधिकारी/कर्मचारी व औषधनिर्माता उपलब्ध करुन देण्याबाबत

**(३२)** * **२४०७७ श्री.निलय नाईक, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगर पालिकेने मुख्य रुग्णालयावरील ताण कमी व्हावा या उद्देशाने “आपला दवाखाना” या उपक्रमाची सुरुवात केली असून सदर दवाखान्यात पुरेसे डॉक्टर, औषधनिर्माता, वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध नसल्याचे तसेच अनेक ठिकाणी डॉक्टरांच्याऐवजी त्यांचे सहायक रुग्णांवर उपचार करीत असल्याने नागरिकांच्या जीवीतास धोका निर्माण झाल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महापालिकेच्या “पी उत्तर” विभागाच्या दिंडोशी (मालाड पूर्व) येथील सिद्धी गार्डन महानगरपालिकेचा आपला दवाखाना येथे रुग्णांना तपासण्यासाठी अनेकदा डॉक्टर उपलब्ध नसल्याबाबत तक्रारी सर्वसामान्यांकडून करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आपला दवाखाना केंद्रात तातडीने पुरेशा प्रमाणात डॉक्टरांसह अन्य वैद्यकीय कर्मचारी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात सद्य:स्थितीत २०६ हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना कार्यरत आहेत. सदर २०६ दवाखान्यांसाठी कंत्राटी वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, औषधनिर्माता, बहुउद्देशीय कामगार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

(२) मालाड पुर्व येथील रिध्दी गार्डन बृहन्मुंबई महापालिकेचा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे ओपीडी मध्ये डॉक्टर उपस्थित नसल्याबाबतची तक्रार बृहन्मुंबई महानगरपालिकेस प्राप्त झाली होती. तथापि, संबंधित वैद्यकीय अधिकारी हे त्यांच्या वडीलांचा अपघात झाल्यामुळे त्यांना दवाखाना सोडावा लागला होता. परंतु, सदर दिवशी रिध्दी गार्डन बृहन्मुंबई महापालिकेचा हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखान्यात बदली वैद्यकीय अधिकारी ओपीडी मध्ये उपस्थित राहण्यासाठी पाठविण्यात आले होते, असे बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या चौकशीअंती आढळून आले आहे.

(३) हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना येथे प्रत्येक दवाखान्यास एक याप्रमाणे वैद्यकीय अधिकारी, परिचारीका, औषधनिर्माता, बहुउद्देशीय कामगार असे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एमएमआरडीएकडून साकारण्यात येणाऱ्या तिसऱ्या मुंबई निर्मितीसाठी स्थानिक नागरिकांचा विरोध होत असल्याबाबत

**(३३)** * **२३२६२ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यातील २९, पनवेल तालुक्यातील ७, पेण तालुक्यातील ८८ मुंबई महानगर प्रादेशिक योजना क्षेत्रातील २ आणि रायगड प्रादेशिक योजना क्षेत्रातील ९ गावांचा समावेश तिसरी मुंबई प्रकल्पासाठी करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पासाठी या १२४ महसुली गावातील परिसर अंदाजे ३२३.४४ चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरला असून तिसऱ्या नवी मुंबई निर्मितीची जबाबदारी सिडकोकडून काढून घेऊन मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) यांच्याकडे सोपविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यासाठी शासनाने दिनांक ४ मार्च, २०२४ रोजी अधिसूचना प्रसिध्द केली असता या अधिसूचनेला शेतकऱ्यांना दिनांक ६ एप्रिल २०२४ रोजी हरकती नोंदविण्यासाठी मूदत देण्यात आली असता शेतकऱ्यांनी २५ हजार हरकतीच्या माध्यमातून प्रकल्पाला विरोध केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकल्पामुळे उरण, पनवेल, पेण (जि.रायगड) येथील शेतकरी हे भूमिहीन होण्याची शक्यता असल्याने शासनाने दिनांक ४ मार्च, २०२४ रोजी प्रसिध्द केलेल्या अधिसूचनेला स्थगिती देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या विनंतीस अनुसरून शासनाने मुंबई महानगर प्रदेशामधील ११५ गावे व रायगड प्रदेशामधील ९ गावे असे एकूण १२४ गावांचे ३२३.४४ चौ.कि.मी. क्षेत्र प्रादेशिक योजना मध्ये नवनगर म्हणुन दर्शविण्याअनुषंगाने आम जनतेकडून सुचना/हरकती मागविण्याची महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २०(३) ची सुचना शासनाने दिनांक ०४/०३/२०२४ रोजी प्रसिध्द केली आहे. उक्त १२४ गावांमध्ये नवी मुंबई विमानतळ प्रभाव अधिसुचित क्षेत्रामधील ८० गांवे, खोपटा अधिसूचित क्षेत्रामधील ३३ गावे, समाविष्ट असून सदर गावांसाठी सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून असलेली नेमणूक शासनाने उक्त अधिनियमाच्या कलम १६० नुसार दिनांक ०४/०३/२०२४ च्या अधिसुचनेन्वये मागे घेतली आहे.
(३) सदर फेरबदल प्रस्तावावर नियुक्त अधिकारी तथा सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई यांच्याकडे सुमारे १७ हजार हरकती/सुचना प्राप्त झाल्या आहेत.
(४) प्राप्त हरकती/सुचना व नियुक्त अधिकारी यांचा अहवाल तसेच त्यावरील संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय विचारात घेऊन, सदर फेरबदल प्रस्तावावर उक्त अधिनियमाच्या कलम २०(४) नुसार निर्णय घेण्याचे नियोजित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कन्हान (जि.नागपूर) नगरपंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी यांनी कार्यरत असताना अनियमितता केल्याबाबत

**(३४) * २३८६० श्री.गोपिचंद पडळकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.अभिजित वंजारी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कन्हान (जि.नागपूर) नगरपंचायतीचे तत्कालीन मुख्याधिकारी यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून अटक करण्यात आली असून त्यांचेवर गुन्हा दाखल करुन निलंबित करण्यात आले असून, सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही त्यांना जिल्हा परिषद, तेल्हारा (जि.अकोला) येथे मुख्याधिकारी या कार्यकारी पदावर नियुक्ती देण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तत्कालीन मुख्याधिकारी या पदावर ते कार्यरत असताना मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार झाल्याने याप्रकरणी चौकशी करुन कारवाई करण्याबाबत निर्देश देऊनही अद्याप याबाबत कोणतीही कारवाई झाली नसल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

- श्री.सतीश गावंडे, मुख्याधिकारी (गट-ब) हे नगरपरिषद कन्हान-पिपरी येथे कार्यरत असताना त्यांचेविरुध्द लाचेची मागणी व स्वीकार केल्याप्रकरणी भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा, १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल व दिनांक २०/३/२०२० रोजी अटक झाल्याने दिनांक २२/९/२०२० रोजीच्या आदेशान्वये शासनाने निलंबित केले.
- त्यानंतर निलंबन आढावा समितीमार्फत निलंबनाचा आढावा घेऊन श्री.गावंडे यांना शासन सेवेत पुनर्स्थापित करुन दिनांक २७/५/२०२१ रोजीच्या आदेशान्वये त्यांची सहाय्यक आयुक्त (गट-ब), जिल्हा प्रशासन अधिकारी, यवतमाळ या अकार्यकारी पदावर पदस्थापना केली.
- सदरच्या अकार्यकारी पदावरील नियुक्तीनंतर सुमारे १ वर्ष ३ महिने इतक्या कालावधीनंतर दिनांक १३/९/२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री.गावंडे यांची मुख्याधिकारी, नगरपरिषद तेल्हारा, जि.अकोला या पदावर बदलीने पदस्थापना करण्यात आली आहे.

(२) व (३) हे खरे नाही.

- श्री.सतीश गावंडे हे कन्हान-पिपरी नगरपंचायतीमध्ये कार्यरत असताना त्यांचेविरुध्द झालेल्या ACB कार्यवाहीचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.
- तसेच श्री.गावंडे यांनी तेल्हारा येथील चाकावरील शौचालय खरेदीत तसेच अंतर्गत रस्त्याच्या कामात केलेल्या अनियमिततेबाबतच्या तक्रारीबाबत जिल्हाधिकारी, अकोला यांनी सदर कामात अनियमितता झाली नसल्याचा अहवाल दिला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उल्हासनगर येथील जग्यासी विकासकाने इमारत बांधकामांमध्ये अनियमितता केल्याबाबत

**(३५) * २३८६७ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उल्हासनगर येथील जग्यासी विकासक यांना सी.टी.एस. क्रं. ८७७६ ते ८७८४ - अ, बॅरॅक क्रं ७६२, रूम नं. १ ते ८, उल्हासनगर -३ येथे २४ मीटर पेक्षा जास्त उंचीच्या इमारतीला बांधकामाची परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर इमारतीच्या बाजूला १२ मीटरचा रस्ता नसणे, वास्तुकलातज्ञ यांनी इमारतीच्या उंचीबाबत दिशाभूल करणे, इमारतीला २ जिने नसणे, तसेच रेफ्युजी क्षेत्रावर स्विमिंग पूल तयार करणे, बी.पी.एम.एस. संगणक प्रणालीमार्फत विकासकाने नकाशाची पडताळणी न करणे याप्रकरणी CAG ने लेखापरीक्षणात आक्षेप घेतले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर प्रकरणी दोषी असलेल्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

सदर जागेवर उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत दिनांक २२/०३/२०२२ रोजी बांधकाम नकाशानुसार २१.६५ मी. उंची असलेल्या इमारतीस बांधकाम परवानगी देण्यात आली आहे.
(२) हे अंशत: खरे आहे.

महालेखापाल कार्यालयाने उल्हासनगर महानगरपालिकेस अर्धसमास पत्र दिनांक २५/०८/२०२२ अन्वये आक्षेप घेतले होते.
(३) महालेखापाल यांनी घेतलेल्या आक्षेपांना उल्हासनगर महानगरपालिकेमार्फत अनुपालन उत्तर सादर करण्यात आल्यामुळे तद्नंतर महालेखापाल कार्यालयाने सदर आक्षेपाचे परिच्छेदामध्ये रुपांतर केलेले नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**~~मौजे खरपुडी (ता.जि.जालना) येथे जालना-खरपुडी नवनगर प्रकल्पाबाबत काढण्यात आलेली अधिसूचना रद्द करण्याबाबत~~**

~~**(३६) * २३८९९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-~~

**मा.सदस्यांचे सदस्यत्व निलंबित करण्यात आल्याने प्रश्न वगळण्यात आला आहे.**

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची प्रलंबित वेतनवाढ व संचित थकबाकी अदा करण्याबाबत

**(३७) * २३४८२ श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे, श्री.प्रवीण दटके, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाला देय असलेली प्रवासी कराची रक्कम आधी भरा, त्यानंतरच वेगवेगळया सवलतींच्या प्रतिपुर्तीची रक्कम देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला असून शासनाच्या "प्रथम प्रवासी कराचा भरणा करा" या भुमिकेमुळे एसटी महामंडळाच्या लातुर विभागातील २ हजार ८०० कर्मचाऱ्यांचे माहे एप्रिल, २०२४ या महिन्याचे वेतनासह पुढील काळातील वेतन प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील एसटी कर्मचाऱ्यांची वेतनवाढ प्रलंबित असून माहे नोव्हेंबर, २०२१ मध्ये अनुक्रमे पाच हजार, चार हजार व अडीच हजार रुपये अशी वेतनवाढ सेवाजेष्ठता न पाळता करण्यात

आली, त्यामुळे वेतनामध्ये विसंगती निर्माण झाली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ च्या तिसऱ्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवासी कराची रक्कम ४ टप्प्यात भरण्याची परवानगी मिळणेबाबत शासनाकडे प्रस्ताव यापुर्वी दाखल केला असून हा प्रस्ताव शासनाच्या वित्त विभागाकडे प्रलंबित असून वेतनाअभावी एसटी कर्मचारी व अधिकाऱ्यांना आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने त्याविरोधात एसटी कर्मचारी संघटनांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, वेतनवाढीतील त्रुटी, शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महागाई भत्ता अशा विविध मागण्यांनुसार कर्मचाऱ्यांचा आर्थिक प्रश्न मार्गी लावण्यासाठी शासनाने दिनांक ४ ऑक्टोबर, २०२३ रोजी त्रिसदस्यीय समिती नेमलेली असून, सदर समितीस त्रुटींची पडताळणी करण्याकरीता दोन महिन्यांचा कालावधी देण्यात आला, परंतु दोन महिन्यांचा कालावधी उलटून गेला असूनही सद्य:स्थितीत एसटी कर्मचाऱ्यांचे विविध आर्थिक प्रश्न प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे तसेच राज्य शासनाने एसटी कर्मचाऱ्यांना वेळेवर वेतन देण्याची मा.न्यायालयासमोर दिलेली हमी लक्षात घेता दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी तसेच एसटी कर्मचाऱ्यांची प्रलंबित वेतनवाढ तात्काळ देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) लातूर विभागातील कर्मचाऱ्यांचे माहे एप्रिल, २०२४ या महिन्याचे वेतन अदा करण्यात आले आहे.

राज्यातील एस.टी. कर्मचाऱ्यांची वेतनवाढ प्रलंबित नाही.

तसेच रा.प. कामगारांच्या आर्थिक व महत्त्वाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी दिनांक ०४/१०/२०२३ रोजी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) व (६) दिनांक ०४/१०/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार स्थापन केलेल्या समितीच्या दिनांक १८/०१/२०२४ तसेच दिनांक ०७/०३/२०२४ रोजी बैठका पार पडलेल्या आहेत. या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१. महामंडळाचे उत्पन्न वाढवून ते स्वयंपूर्ण करण्याबाबत कामगार संघटनांना आवाहन करावे.

२. संपकाळात मूळ वेतन वाढीचा लाभ म्हणून सेवा कालावधीनिहाय रुपये ५०००/-, रुपये ४०००/- व रुपये २५००/- अशी वाढ दिल्याने जी विसंगती निर्माण झाली आहे, त्याबाबत सरसकट रुपये ५०००/- देता येणार नाहीत. परंतु अशा वेतनवाढीमुळे काही ठिकाणी कनिष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतन जेष्ठ कर्मचाऱ्यांच्या वेतनापेक्षा जास्त आहे, त्यामुळे विसंगती निर्माण झाल्याचे दिसते अशा प्रकारे सेवाजेष्ठ कर्मचाऱ्यांचे वेतन त्यांच्या कनिष्ठाइतके वाढविता येऊ शकेल, याची माहिती समितीस उपलब्ध करावी, त्यानंतर त्याबाबत निर्णय घेता येईल.

याबाबत माहितीची पडताळणी करुन समितीस सादर करण्यात येत आहे.

----------------

## मुंबईतील झोपडपट्टी भागात मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे विस्तारण्याबाबत

**(३८) * २३६३० श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहरातील २२.२० टक्के झोपडपट्टी भागात मलनि:सारण सुविधा नसल्यामुळे थेट नदी-नाल्यांमध्ये मलमूत्रयुक्त सांडपाणी सोडण्यात येत असल्यामुळे नदी व नाले परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरुन प्रदूषणामध्ये वाढ होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबई शहरातील मूलभूत सुविधा वाढविण्यावर बृहन्मुंबई महानगरपालिकेने भर देऊन सदरील भागांत मलनि:सारण वाहिन्यांचे जाळे विस्तारण्यासह मजबुतीकरणासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मुंबई शहरातील काही झोपडपट्टीचा भाग हा नदी व नाल्याच्या आजुबाजूच्या परिसरात व्याप्त आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व प्रमुख नाल्यांमध्ये येणारा बिनपावसाळी पाण्याचा मलप्रवाह अडविणे व जवळच्या अस्तित्वात असलेल्या मलनि:सारण वाहिनीला वळविण्याच्या कामासाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यासाठी दिनांक २०/०२/२०२३ रोजी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर सल्लागाराने सादर केलेला स्थळदर्शक अहवाल व निरीक्षण अहवाल मंजूर झाला असून, मसुदा सविस्तर प्रकल्प अहवाल (DDPR) सादर करण्याची कार्यवाही सल्लागारामार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सह्याद्री पर्वतरागांमधील जमिनीची धूप रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३९) * २३२०९ श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सह्याद्री पर्वतरागांमधील जमिनीची सन १९९० ते २०२० या कालावधीत जवळपास ९७ टक्के धूप झाली असल्याचे आयआयटी मुंबईने केलेल्या अभ्यासानुसार जाहीर करण्यात आल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जमिनीची धूप थांबविण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) अहमदाबाद येथिल टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात दिनांक २५ मार्च, २०२४ रोजी सदर बाबत बातमी प्रसिद्ध तथापि याबाबत विभागास कोणताही अहवाल प्राप्त नाही.

परंतु राज्याच्या मृद व जलसंधारण विभागामार्फत पश्चिम घाट क्षेत्रात विविध मृद व जलसंधारण आणि पाणलोट क्षेत्र व्यवस्थापनाच्या उपाययोजना सक्रियपणे राबविण्यास चालना देण्यात येत आहे. यामध्ये सलग समतल चर (सीसीटी),खोल सलग समतल चर, मातीचे बांध,अनघड दगडी बांध (LBS),गॅवियन स्ट्रक्चर्स, मजगी, वळण बंधारे,शेततळे, सिमेंट नाला बंधारे, फळबाग लागवड असे उपचार केले जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात दुचाकी वाहन खरेदीवर मिळणाऱ्या अनुदानाकरीता बनावट पत्त्यावर दुचाकी वाहन खरेदी केल्याबाबत

**(४०) * २३८८४ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदयुत (इलेक्ट्रीक) वाहनांना प्रोत्साहन मिळण्यासाठी दुचाकी वाहन खरेदीवर शासनाचे अनुदान मिळत असल्याने मुंबईत बोगस पत्त्यावर खरेदी केलेल्या सुमारे ५ लाख ६४ हजार दुचाकी वाहनांची चौकशी करण्यात येणार असल्याची बाब माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासाठी शासनाने माहे एप्रिल, २०२२ पासून अनुदानाचे अंदाजे रुपये १,४०० कोटी प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशाप्रकारे बोगस पत्त्यावर वाहन खरेदी करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) नाही.

(२) हे खरे नाही. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दिनांक २३/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण - २०२१ जाहीर केले आहे. याद्वारे १,००,००० दुचाकींना प्रति वाहन महत्तम रुपये १०,००० एवढे प्रोत्साहन अनुदान देण्यात येणार आहे. ८३३९४ दुचाकी वाहनांना प्रोत्साहन अनुदान वितरित करण्याकरीता मागणी प्राप्त झाली होती. त्यापैकी, ५१९५२ वाहनांना प्रोत्साहन अनुदान वितरित करण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विकास हायस्कूल व ज्युनियर कॉलेज व सुयश विद्यालय, घाटकोपर (पूर्व) तसेच मुंबईतील रात्रशाळांच्या बृहन्मुंबई महानगरपालिका इमारतीतील वर्गखोल्या कायम ठेवण्याबाबत

**(४१) * २२९४७ श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विकास हायस्कूल व ज्युनियर कॉलेज आणि सुयश विद्यालय, घाटकोपर (पूर्व) यांच्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारतीतील वर्गखोल्या कायम ठेवण्याबाबत त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे स्वतंत्र विनंती अर्ज केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील शिक्षण संस्थांना महानगरपालिकेच्या इमारतीतील रिक्त जागा ह्या दिवस व रात्रशाळांना नाममात्र भाड्याने देण्याबाबत तसेच थकीत भाडे माफ करण्याबाबत तत्कालीन मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी आदेश दिले होते, त्याच धर्तीवर याबाबत विद्यमान मुख्यमंत्री महोदयांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला आदेशित केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नझीर नाईट हायस्कूल, शिवडी या रात्रशाळेचे स्थलांतर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिवाजीनगर येथील शाळेत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शालेय इमारतींमध्ये दिवसा सुरु असलेल्या मराठी माध्यमाच्या खाजगी शाळांच्या व संलग्न ज्युनिअर महाविद्यालयाच्या वर्गाकरीता भाडेतत्वावर घेतलेल्या वर्गखोल्यांसाठी दरवर्षी आकारण्यात येणाऱ्या १०% भाडेवाढीस पुढील ५ वर्षे स्थगिती देण्याबाबत महामुंबई शिक्षक संघटना या संस्थेने सादर केलेल्या पत्राच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) नझीर नाईट हायस्कूल ही ट्रस्टची शाळा शिवडी क्रॉसरोड उर्दू उच्च प्राथमिक शाळा या मनपाच्या शाळेत कार्यरत आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शाळा पायाभूत सुविधा कक्ष यांचेकडून शिवडी क्रॉसरोड उर्दू उच्च प्राथमिक शाळा मोडकळीस आली असल्याचे तसेच, विद्यार्थी वर्ग व इतर कर्मचाऱ्यांस धोका निर्माण होण्याचे कळविण्यात आले आहे. त्यानुसार प्राप्त पत्रास अनुसरुन शिवडी क्रॉस रोड उर्दू लोअर प्राथमिक शाळा इयत्ता बालवाडी ते ४ थी शिवडी एमपीएस शाळेत, इयत्ता ५ वी ते ७ वी परेल मनपा शाळेत तसेच इयत्ता ९ वी व १० वी बारादेवी मराठी शाळेत स्थलांतरीत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ऐरोली (नवी मुंबई) खाडीतील केमिकल मिश्रित पाण्यामुळे माशांसह फ्लेमिंगो पक्षांचा मृत्यू होत असल्याबाबत

**(४२) * २३८०७ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नवी मुंबईतील ऐरोलीच्या खाडीतील पाण्यात काही समाजकंटकांनी केमिकल मिसळल्यामुळे परिसरातील लाखो मासे मृत पावले असून त्यामुळे काही फ्लेमिंगो पक्षांचा देखील मृत्यू झाल्याची बाब माहे एप्रिल,२०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केमिकलयुक्त दूषित पाण्यामुळे सागरी संपत्तीची मोठ्या प्रमाणात हानी होत असून तेथील स्थानिकांनी याबाबत नाराजी व्यक्त केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी जल प्रदूषणास कारणीभूत असणाऱ्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

माहे एप्रिल, २०२४ मध्ये प्रश्नाधिन परिसराच्या भेटीदरम्यान ऐरोली खाडीजवळ केमिकल मिसळल्यामुळे मासे मरतूक झाल्याचे व फ़्लेमिंगो मृत पावल्याचे आढ़ळून आले नाही. तथापि, मत्स्य व्यवसाय विभाग, ठाणे यांचेकडून प्राप्त अहवालानुसार खाडीच्या परिसरातील तळयांमध्ये साचलेला गाळ, पाण्याची अत्यल्प पातळी, पाण्याची खालावलेली गुणवत्ता (पाण्याचा हिरवा रंग, शेवाळ, कचरा) यामुळे पाण्यातील प्राणवायु व पाण्याचे तापमान यावर विपरीत परिणाम झाल्यामुळे माशांची मरतुक झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फ़त प्रश्नाधिन परिसरातील पाण्याचे नमुने नियमितपणे गोळा करण्यात येतात. सदर पृथ:करण अहवालावरून सदरील पाण्याची गुणवत्ता सरासरी मर्यादित असल्याचे आढळून आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेने मोठ्या प्रकल्पांना झालेल्या विलंबाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याबाबत

**(४३) * २३०१७ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेने सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात मोठ्या खर्चाचे आणि अनेक वर्षे चालणारे प्रकल्प हाती घेतले असून, या प्रकल्पांमुळे महानगरपालिकेचे दायित्व रुपये दोन लाख कोटींहून अधिक झाले असून आर्थिक व्यवहारामध्ये गैरव्यवस्थापन झाले असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेला मोठ्या पायाभूत प्रकल्पांसाठी विलंब का झाला, याची श्वेतपत्रिका काढण्याची मागणी मा.लोकप्रतिनिधींनी आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने मुंबईतील मोठ्या प्रकल्पांना झालेल्या विलंबाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

मुंबई शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने मोठ्या प्रमाणात महत्वाचे पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले असून, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षाअखेरीस हाती घेतलेल्या प्रकल्प खर्चाचे दायित्व रुपये १,९९,२८३.६३ कोटी इतके आहे.

(२) हे खरे आहे.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येत असलेले पूर्वीचे, तसेच, सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात नव्याने मंजूर केलेले संबंधित प्रकल्प हे महत्वाकांक्षी व मोठ्या स्वरुपातील असल्यामुळे सदर

प्रकल्पांच्या पूर्णत्वाचा कालावधी हा जास्त आहे. सदर प्रकल्प राबविण्यामध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून कोणताही विलंब करण्यात येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वेकोली (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथील कोळसा खाणीत नियमबाह्य पध्दतीने उत्खनन होत असल्याबाबत

**(४४) * २३४७३ श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बल्लारपूर क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वेकोली (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे मोठ्या प्रमाणात असलेल्या भुमिगत व खुल्या कोळसा खाणीत कोळसा उत्खननासाठी करण्यात येणाऱ्या शक्तीशाली ब्लास्टींगमुळे सदर परिसरातील अनेक घरांना, इमारतींना अल्पावधीत तडे गेले असून भिंती कोसळल्याच्या घटनाही घडल्या आहेत, तसेच शेतात सिंचनासाठी खोदलेल्या बोअरवेलच्या खड्ड्यात टाकलेल्या मोटार शक्तीशाली ब्लास्टींगमुळे कायमच्या खड्ड्यात गेल्या असून शेतकऱ्यांचेही लाखो रुपयांचे नुकसान झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ च्या सप्ताहात वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वेकोलीतील कोळसा खाणींमध्ये नियमबाह्य पध्दतीने होत असलेल्या शक्तीशाली ब्लास्टींगमुळे खाण परिसरातील लगतच्या गावांना धोका निर्माण झाला असून यासंदर्भात गावकऱ्यांनी प्रशासनाकडे तक्रार करुनही याची दखल न घेता वेकोलीने ब्लास्टींग सुरुच ठेवली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या खाणींमार्फत वेकोलीला कोट्यवधी रुपयांचा नफा मिळत असून नुकसानग्रस्त गावकऱ्यांना व शेतकऱ्यांना भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन बल्लारपूर क्षेत्रांतर्गत येणाऱ्या वेकोली (ता.राजुरा, जि.चंद्रपूर) येथे मोठ्या प्रमाणात असलेल्या भुमिगत व खुल्या कोळसा खाणीत नियमबाह्य पध्दतीने होत असलेल्या शक्तीशाली ब्लास्टींगवर तातडीने निर्बंध घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३), (४) व (५) वेस्टर्न कोलफिल्ड लि. या केंद्र शासनाचा अंगिकृत उपक्रम असलेल्या कंपनीच्या बल्लारपूर क्षेत्रातर्गत १ भूमिगत व ७ खुल्या कोळसा खाणी आहेत.

या क्षेत्रात कोळसा खनिज उत्खननासाठी करण्यात येत असलेले ब्लास्टींग हे कोळसा खाणी नियम २०१७ व खाण सुरक्षा महानिर्देशालय (तांत्रिक) यांचे अधिसूचनेन्वये आणि खाण सुरक्षा निर्देशक, भारत सरकार, नागपूर यांच्या मान्यतेने, ग्राऊंड कंपन परवानगी मर्यादेच्या आत करण्यात येते. जे व्हायब्रोमीटरद्वारे मोजणी करुन कंन्ट्रोल ब्लास्टींग पध्दतीने, ब्लास्टींग केले जाते.

या परिसरात कन्ट्रोल ब्लास्टींग पध्दतीने केलेल्या ब्लास्टींगमुळे घरांचे, बोअरवेलचे नुकसान झाल्याबाबत येथील नागरिक व घरमालक यांचेकडून कोणतीही तक्रार अद्याप जिल्हाधिकारी कार्यालय

अथवा तहसिलदार, राजुरा अथवा महाप्रबंधक, मे.वेस्टर्न कोलफिल्डस यांचेकडे प्राप्त झालेली नाही. तथापि, विविध मागण्यासंदर्भातील एक निवेदन जिल्हाधिकारी चंद्रपूर यांना प्राप्त झालेले आहे. त्यासंदर्भात कंपनीकडे पाठपुरावा करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २७०० कामगारांना सेवेत सामावून घेण्याबाबत

**(४५) * २२९६१ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंत्राटी कामगारांनी २४० दिवस काम केल्यास कामगार कायद्यानुसार त्यांना कायम सेवेत घेणे बंधनकारक आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेतील २७०० कामगारांना महानगरपालिका सेवेत सामावून घ्यावे, असा निर्णय सन २०१७ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिला असतानाही आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुख्य अभियंता, घनकचरा विभाग यांनी ७ वर्षे होऊनही आजमितीपर्यंत सदरहू आदेशाची अंमलबजावणी केली नसल्याची बाब दिनांक १२ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषींविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

तथापि, The Bombay Industrial Employment (Standing orders) Rule, १९५९ मधील कलम ४(c) नुसार महानगरपालिकेद्वारे प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या एसएलपी ६२०२/२०१७ मधील दिनांक ०७/०४/२०१७ मधील आदेश तसेच वेळोवेळी प्राप्त झालेले सुनावणी आदेशांच्या अनुषंगाने कचरा वाहतूक सेवा संघाच्या २७०० कामगारांपैकी औद्योगिक न्यायालयाच्या संबंधित अधिकाऱ्यांमार्फत पडताळणी झालेल्या २०४५ कामगारांना बृहन्मुंबई महानगरपालिकेत कायम करण्यात आले असून, त्यांना आर्थिक फायदे देण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापूर (जि.अकोला) येथील मनकर्णिका व महेशा नद्या प्रदूषित झाल्याबाबत

**(४६) * २३९१९ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर (जि.अकोला) हे मनकर्णिका व महेशा या नद्यांच्या संगमावर वसले असून सदर नद्यांमध्ये शहरातील सांडपाणी व घनकचरा टाकला जात असल्यामुळे सदर नद्या प्रदूषित झाल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या नद्यांवर असलेल्या पारस प्रकल्पाच्या मनारखेड धरणामुळे नदीपात्रातील पाणी अडवले जात असल्यामुळे नदीपात्रातील गाळ, घनकचरा तसाच पडून राहील्यामुळे खोल नदीपात्र उथळ झाले असून पावसाळ्यात नदीला पूर आल्यास पाणी बाजारपेठेमध्ये पसरल्यामुळे गावकऱ्यांचे नुकसान होते, यासाठी पारस प्रकल्प व नगरपरिषदेने नदीपात्र खोलीकरण व स्वच्छता करावी, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन गावकऱ्यांचे होणारे नुकसान टाळण्याकरीता बाळापूर (जि.अकोला) येथील दोन्ही बाजूंनी वाहणाऱ्या मनकर्णिका व महेशा या नद्यांच्या पात्रांचे तात्काळ खोलीकरण व स्वच्छता करुन नद्यांचे प्रदूषण रोखण्याकरीता कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मुख्याधिकारी, नगरपरिषद, बाळापूर यांचे दिनांक २०/०६/२०२४ रोजीचे अहवालानुसार नदीच्या पाण्याचे प्रदूषण रोखण्यासाठी व उपाययोजना करण्याबाबत नागरीकांचे / लोकप्रतिनिधीचे निवेदने नगरपरिषदेस प्राप्त झाले आहेत.

मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विदुयत निर्मीती कंपनी मर्यादीत, औष्णिक विदयुत केंद्र, पारस, ता.बाळापूर जि.अकोला यांचे दिनांक २४/०६/२०२४ रोजीचे अहवालानुसार पारस प्रकल्प बंधारा /बॅरेजची उंची १५ मीटर आहे व रेडीयल गेट ची उंची ११ मीटर आहे. तसेच ओगी विअरची उंची ४ मीटर आहे. पारस बॅरेजची क्षमता कमी असल्यामुळे लवकर भरतो व अतिवृष्टी झाल्यास रेडीयल गेट उघडले जातात. त्यामुळे नदीपात्रातील गाळ वाहून जातो. म्हणून नदीपात्र उथळ होवू शकत नाही. तसेच नदीपात्र खोलीकरण व स्वच्छता करण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधीकडून विचारणा / अर्ज त्यांचेकडे प्राप्त झालेले नाही. पावसाळयामधे नदीला पूर आल्यास पारस प्रकल्पातर्फे रेडीयल गेट अशाप्रकारे उघडल्या जातात की, बाजारपेठेमधे नदीचे पाणी शिरणार नाही.

(३) मुख्याधिकारी, नगरपरिषद, बाळापूर यांचे दिनांक २०/०६/२०२४ रोजीचे अहवालानुसार नगरपरिषदेमार्फत शहरातील सांडपाणी व्यवस्थापनाकरीता अमृत २ योजनेंतर्गत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व नदीला येणाऱ्या पूरापासून संरक्षण होणेकरीता पूर संरक्षक भिंत बांधणेबाबतचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून तांत्रिक मान्यता घेवून प्रशासकीय मान्यतेसाठी नगरविकास विभाग सादर करण्यात येणार असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत होणाऱ्या नैसर्गिक दुर्घटनांमधील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याबाबतचे धोरण निश्चित करणेबाबत

**(४७) * २३१२३ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडाळा (मुंबई) येथील महर्षी कर्वे उद्यानातील पाण्याच्या टाकीत बुडून २ बालकांचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १८ मार्च, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर घटना बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या निष्काळजीपणामुळे होऊनही महानगरपालिकेकडून मृत बालकांच्या कुटुंबियांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अशा प्रकारच्या दुर्घटनांमध्ये नुकसान भरपाई म्हणून महानगरपालिकेचे कोणतेही धोरण नसल्यामुळे मृत बालकांच्या कुटुंबियांना नुकसान भरपाई मिळण्यास दिरंगाई होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मुंबई शहरात सातत्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारीत होणाऱ्या नैसर्गिक दुर्घटनामध्ये मृत्यूमुखी पडलेल्यांच्या कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी महानरपालिकेकडून धोरण निश्चित करण्याबाबत कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) वडाळा (मुंबई) येथील महर्षी कर्वे उद्यानातील पाण्याच्या टाकीत बुडून २ बालकांचा मृत्यू झाल्याप्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सुमोटो जनहित याचिका क्र. २/२०२४ दाखल करुन घेतली आहे. सदर घटनेतील मृतांच्या पालकांना मा.न्यायालयाच्या आदेशानुसार प्रत्येकी रुपये ५ लाख इतकी रक्कम नुकसान भरपाई म्हणून देण्याकरीता कंत्राटदारामार्फत मा.उच्च न्यायालयात रुपये १० लाख इतकी रक्कम जमा करण्यात आली आहे.
(४) बृहन्मुंबई महानगरपालिकेने झाडे पडुन होणाऱ्या नैसर्गिक दुर्घटनेबाबत धोरण निश्चित केले आहे. या शिवाय इतर दुर्घटनांबाबत महानगरपालिकेद्वारे राज्य शासनाच्या धोरणाचा अवलंब करण्यात येतो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## फैजपूर (जि.जळगाव) नगरपरिषदेच्या विविध विकास कामांमधील भ्रष्टाचाराबाबत

**(४८) * २३७४१ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव जिल्ह्यातील फैजपूर नगरपरिषदेच्या विविध विकास कामांमधील अपहार प्रकरणी दिनांक ३० सप्टेंबर, २०२२ रोजी जिल्हाधिकारी यांच्या पत्रान्वये दोषींविरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आदेशाचे उल्लंघन करून नूतन जिल्हाधिकारी यांनी अधिकार क्षेत्रात नसताना सुनावणी घेवून बनावट दस्तऐवजाचा आधार घेत दोषींना अभय देत बेकायदेशीर संरक्षण दिले, शासनाची आर्थिक फसवणूक केली, कोणतीही कारवाई केली नाही अशा आशयाची तक्रार दिनांक ३ एप्रिल २०२४ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीच्या अनुषंगाने सन २०२२ मध्ये जिल्हाधिकारी यांनी फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे निदेश दिले असताना तद्नंतरच्या जिल्हाधिकारी यांनी दोषींना अभय दिल्या प्रकरणी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली अथवा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे खरे आहे,

जिल्हा भ्रष्टाचार निर्मुलन समिती तथा जिल्हाधिकारी, जळगांव यांनी दिनांक ३०/०९/२०२२ रोजी संबंधित जबाबदार कर्मचारी यांच्याविरुध्द फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करणेबाबत आदेशित केले होते.
(२) अशा आशयाची तक्रार दिनांक ३०/०३/२०२४ रोजी प्राप्त झाली आहे.
(३) मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथील फौजदारी रिट याचिका क्र.६२२/२०२३ मध्ये दिनांक १२/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये जिल्हाधिकारी, जळगांव यांच्या दिनांक ३०/०९/२०२२ रोजीच्या आदेशाप्रमाणे फौजदारी कार्यवाही करणेबाबत आदेशित केले. मा.सर्वोच्च न्यायालयाने SLP(Cr) No.९७६८/२०२३ मध्ये दिनांक ०४/०८/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्या उपरोक्त आदेशास अंतरिम स्थगिती दिली.

दरम्यान याच प्रकरणी तत्कालीन उपविभागीय अधिकारी यांनी संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे म्हणणे ऐकून न घेता चौकशी समितीचा अहवाल दिला, अशी विनंती संबंधित अधिकारी/कर्मचारी यांनी केल्याने तत्कालीन जिल्हाधिकारी, जळगांव यांनी त्यांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन दिनांक ०७/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये संबंधितांना ताकीद दिली तसेच संबंधित मक्तेदारांना काळया यादीत टाकण्याची कार्यवाही करण्याबाबत मुख्याधिकारी, फैजपूर यांना निर्देश दिले.

तद्नंतर सदर प्रकरणी मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे WP No.९१४९/२०२२ i.e. PIL No. ५४/२०२२ दाखल असून सदर प्रकरण सध्या मा.न्यायालयात प्रलंबित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे शहरातील रस्त्यांवरील ब्लॅक स्पॉटची संख्या कमी करण्याबाबत

**(४९) * २३८२४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे पोलीस आयुक्तालय परिसरात २४ ब्लॅक स्पॉटवर दोन वर्षामध्ये ३४६ अपघातांत १२३ जणांचा बळी गेला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रस्ते अपघातात बळी गेलेल्या व्यक्तींची संख्या लक्षणीय असून या पार्श्वभूमीवर ब्लॅक स्पॉट कमी करण्यासाठी शासनाने समिती नेमण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर समितीने सर्व्हेक्षण करुन ब्लॅक स्पॉट असल्याचा अहवाल सादर केला आहे काय, तसेच नगररचना विभागाने रेखांकन केले आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सदर परिसराची पहाणी करुन अपघाताच्या ब्लॅक स्पॉटवरील अतिक्रमणे हटविण्याबाबत तेथे कोणत्या उपाययोजना केल्या आहेत तसेच ब्लॅक स्पॉटची संख्या कमी करण्याबाबत कोणता निर्णय घेतला आहे वा घेण्यात येत आहे,
(५) अद्याप कोणताही निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) याबाबतचे वृत्त मे, २०२४ मध्ये प्रकाशीत झाले आहे.

(२) दिनांक ०५/१२/२०२२ रोजीच्या अधिसूचनेन्वये राज्य रस्ता सुरक्षा परिषद व प्रत्येक जिल्ह्याकरीता जिल्हा रस्ता सुरक्षा समिती गठीत करण्यात आली आहे.

जिल्हा रस्ता सुरक्षा समिती ही जिल्हाधिकारी, यांच्या अध्यक्षतेखाली गठित करण्यात आलेली आहे. सदर समितीमध्ये रस्ता सुरक्षेशी संबंधित सर्व विभागातील सदस्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सदर समिती रस्ता सुरक्षेसंदर्भात नियमित बैठका घेऊन उपाययोजना राबविते.

तसेच संसद सदस्य यांच्या अध्यक्षतेखाली देखील रस्ता सुरक्षा समिती देखील गठित करण्यात आलेली आहे.

(३) व (४) परिवहन विभाग, पोलीस स्टेशनचे संबंधित अधिकारी व रस्ते विभागाचे संबंधित अधिकारी यांचेद्वारे एकत्रितपणे अपघातप्रवण क्षेत्रांचे सर्वेक्षण करण्यात आले असून त्याबाबत रस्ते विभागाने करावयाच्या उपाययोजना सुचविण्यात आलेल्या आहेत.

रस्ता सुरक्षेबाबत इतर उपाययोजना राबविण्याकरीता जिल्हा स्तरावर जिल्हा नियोजन समिती अतंर्गत रस्ता सुरक्षा उपाययोजना करण्यासाठी स्वतंत्रपणे "जिल्हा रस्ता सुरक्षा उपाययोजना" ही योजना सुरु करण्यात आली आहे.

रस्ता सुरक्षा बाबत प्रादेशिक परिवहन कार्यालय तसेच उप प्रादेशिक परिवहन कार्यालय यांनी त्यांच्या अखत्यारीतील ब्लॅक स्पॉटचे सर्वेक्षण करुन त्याबाबतचा कृती आराखडा तयार केलेला आहे व त्या अनुषंगाने उपाययोजना करण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील मलबार हिल जलाशय पुनर्बांधणीबाबत

**(५०) * २३९८६ श्री.राजहंस सिंह : तारांकित प्रश्न क्रमांक २१९१६ ला दिनांक २० डिसेंबर, २०२३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील मलबार हिल ब्रिटिशकालीन जलाशय पुनर्बांधणी संदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या आठ जणांच्या तज्ञ समितीचे दोन अहवाल सादर झाले आहेत, परंतु त्यातून निष्कर्ष काढण्यात आलेला नसल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अहवालावर अंतिम निर्णय देण्यासाठी आणखी काही तज्ञांची नियुक्ती केली जाणार असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जलाशयामार्फत कुलाबा, फोर्ट, सीएसएमटी, कफ परेड, नरिमन पॉइंट, चर्चगेट, सँडहर्स्ट रोड, गिरगाव, काळबादेवी, मलबार हिल, नेपियन्सी रोड, ग्रँट रोडमधील विविध भागात पाणीपुरवठा केला जातो, दक्षिण मुंबईची वाढती पाण्याची मागणी विचारात घेऊन तसेच जलाशयाचे आयुर्मान संपुष्टात आले असल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सदर जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम हाती घेण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या प्रचलित कार्यपध्दतीनुसार सदर कामाच्या निविदा मागविण्यापूर्वी मूळ जलाशयाच्या पश्चिम बाजूस पर्यायी जलाशय बांधून त्याद्वारे सद्य:स्थितीतील पाणीपुरवठा सुरळीत ठेवण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे,
(५) असल्यास, मलबार हिल जलाशयाच्या पुनर्बांधणीच्या प्रकल्पाकरीता आवश्यक निधी उपलब्ध होऊन प्रस्तावित कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर जलाशयाच्या पुनर्बांधणीच्या प्रस्तावाचे पुनर्विलोकन करण्यासाठी आय.आय.टी. मुंबई या संस्थेतील प्राध्यापक, स्थानिक तज्ञ तसेच बृहन्मुंबई महानगरपालिका उपायुक्त (विशेष अभियांत्रिकी) यांचा समावेश असलेली ८ सदस्यीय तज्ञ समिती स्थापन केली होती. सदर समितीने चार सदस्यांचा प्रत्येकी एक अहवाल असे दोन स्वतंत्र अहवाल बृहन्मुंबई महानगरपालिकेस सादर केले आहेत. दोन्ही अहवालांमधील मते लक्षात घेता, त्यामध्ये मतभिन्नता असल्याचे दिसून आले आहे.
(२) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेने गठीत केलेल्या तज्ञ समितीने सादर केलेल्या दोन स्वतंत्र अहवालामध्ये मतभिन्नता असल्यामुळे, दोन्ही अहवालांचे विश्लेषण करुन अंतिम निष्कर्ष सुचविण्याकरीता नागरी अभियांत्रिकीमधील आय.आय.टी. रुरकी या नामांकित संस्थेच्या तज्ञ प्राध्यापकांची नियुक्ती करण्यात आली आहे.

सदर तज्ञ प्राध्यापकांकडून मलबार टेकडी जलाशयाची दिनांक ०३/०६/२०२४ व दिनांक ०४/०६/२०२४ रोजी अंतर्गत पाहणी करण्यात आलेली आहे व प्रस्तुत प्रकरणी त्यांचा अंतिम अहवाल लवकरच अपेक्षित आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर मलबार टेकडी जलाशयाच्या पुनर्बांधणीच्या कामाच्या निविदेअंतर्गतच, मूळ जलाशयाच्या पश्चिम बाजूस २३ द.ल.लि. क्षमतेचा अतिरिक्त कप्पा बांधून व त्यावर ७ द.ल.लि. ची तात्पुरती टाकी बांधून त्याची जोडणी मूळ जलाशयाच्या वितरण प्रणालीशी करण्यात येणार होती जेणेकरुन सद्य:स्थितीत मलबार टेकडी जलाशयातून होणारा दैनंदिन पाणीपुरवठा सुरळीत ठेवून, मूळ जलाशयाच्या पुनर्बांधणीचे काम टप्प्याटप्प्याने प्रस्ताविलेले होते. तथापि, आय.आय.टी. रुरकी यांचेकडून प्राप्त होणाऱ्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) सदर कामाकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकात आवश्यक निधीची तरतूद करण्यात आली असून, आय.आय.टी. रुरकीच्या तज्ञ समितीचा पुनर्बांधणी विषयीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार सदर कामाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभारण्याबाबत

**(५१) * २३६१४ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यात मोठ्या प्रमाणात असलेल्या गोदामांना सातत्याने लागत असलेल्या आगींच्या घटना रोखण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने याठिकाणी स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभारण्याची घोषणा काही वर्षांपूर्वी करुनही अदयाप सदर यंत्रणा उभारण्याचे काम सुरु झाले नसल्याचे माहे एप्रिल,२०२४ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भिवंडी तालुक्याच्या ग्रामीण भागातील गोदामांमध्ये लागणाऱ्या आगीच्या दुर्घटना रोखण्यासाठी भिवंडीसह ठाणे व कल्याण येथील अग्निशमन यंत्रणेवर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने स्वतंत्र अग्निशमन यंत्रणा उभारण्याची घोषणा होऊनही कामास विलंब करणाऱ्या संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील ५१ गावांच्या (सुधारित ६० गावे) भिवंडी परिसर अधिसूचित क्षेत्रासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ च्या कलम ४०(१)(C) अन्वये "विशेष नियोजन प्राधिकरण" म्हणुन नियुक्ती केली आहे.सदर क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम,१९६६ च्या तरतुदींनुसार विकास योजना आराखडा मंजूर झाला आहे.

सदर मंजूर केलेल्या विकास योजनेमध्ये अग्निशमन केंद्रासाठी एकूण १५ आरक्षणे नियोजित आहेत. सद्य:स्थितीत सदर अधिसूचित क्षेत्रातील मौ.अंजूर येथील एकात्मिकृत नगर वसाहत प्रकल्पामधील अग्निशमन केंद्र बांधून तयार असून विकासकामार्फत महाराष्ट्र अग्निशमन सेवा संचालनालय यांना हस्तांतरणाची प्रक्रिया सुरु आहे.

प्राधिकरणाने दिनांक ०७/०७/२०२० रोजी झालेल्या १४९ व्या बैठकीत ठराव क्र.१५२७ द्वारे प्राधिकरणामार्फत स्वतंत्र अग्निशमन सेवा स्थापन करणे व त्याकरीता प्रस्तावित केल्याप्रमाणे मनुष्यबळाची नेमणूक करण्यास मान्यता दिली आहे. प्राधिकरणाने मान्यता दिल्यानुसार अग्निशमन यंत्रणा कार्यान्वित करण्यासाठी प्राधिकरणामध्ये मुख्य अग्निशमन अधिकारी किंवा अग्निशमन अधीक्षक या संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा प्रतिनियुक्तीने उपलब्ध करुन द्याव्यात, अशी विनंती संचालक, महाराष्ट्र अग्निशमन सेवा यांना प्राधिकरणामार्फत करण्यात आली आहे. व याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## ~~राज्यातील दिव्यांग व्यक्तींकरीताच्या फिरत्या वाहनावरील दुकानांच्या खरेदी प्रक्रियेत अनियमितता झाल्याबाबत~~

~~**(५२) * २३८९३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-~~

**मा.सदस्यांचे सदस्यत्व निलंबित करण्यात आल्याने प्रश्न वगळण्यात आला आहे.**

-----------------

## राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गतच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्त्याचा लाभ मिळण्याबाबत

**(५३) * २३४८० श्रीमती उमा खापरे, श्री.चंद्रशेखर बावनकुळे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.निलय नाईक, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, प्रा.राम शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषतः अमरावती जिल्ह्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत येत असलेल्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थी निर्वाह भत्त्याच्या लाभापासून वंचित असून त्यांनी त्यांच्या प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याची मागणी केली असल्याची बाब माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील वसतिगृहातील विद्यार्थ्यांना दरमहा निर्वाह भत्ता, आरोग्याच्या सुविधा,भोजन सुविधा, पुरेशी सुरक्षा देणे इ.मागण्यांची पूर्तता करण्याची बाब शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने राज्यातील तसेच विशेषत: अमरावती जिल्ह्यातील सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारितील शासकीय वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता अदा करण्यासह इतर प्रलंबित मागण्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) होय.

(२) अंशत: खरे आहे.

विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना देय असलेला माहे डिसेंबर, २०२३ पर्यंतचा निर्वाह भत्ता विद्यार्थ्यांना देण्यात आलेला असून, प्रवेशित विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाचे भोजन, पुरेशी सुरक्षा इत्यादी सोयी-सुविधा नियमितपणे देण्यात येत आहेत.

(३) विभागांतर्गत शासकीय वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना देय असलेला निर्वाह भत्ता अदा करण्यासाठी सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये एकूण ९२ कोटी इतकी रक्कम अर्थसंकल्पित करण्यात आलेली असून, सदर रक्कम उपलब्ध करून देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माथेरान (जि.रायगड) येथील ई-रिक्षांचे दर निश्चित करण्याबाबत

**(५४) * २३१९२ श्री.प्रसाद लाड, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) माथेरान (जि.रायगड) येथे ई-रिक्षा ही हातरिक्षा चालकांना चालविण्यास द्याव्यात असे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १० जानेवारी, २०२४ रोजी वा त्यासुमारास आदेश दिले असतानाही नगरपालिकेच्या नियोजनाअभावी येथील सनियंत्रण समितीने अद्याप या ई- रिक्षा हातरिक्षा चालकांच्या ताब्यात दिल्या नसल्यामुळे सदर रिक्षा बंद अवस्थेत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, न्यायालयाचे आदेश असतानाही ई-रिक्षा हातरिक्षा चालकांना चालविण्यास परवानगी न देता नगरपालिकेने खरेदी केलेल्या ई-रिक्षा या ठेकेदाराकडून वापरण्यात येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या ई-रिक्षा चालकांच्या ताब्यात देत असताना आरटीओ कार्यालयाने या रिक्षाचे दर निश्चित करावे अशी मागणी तेथील स्थानिकांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन न करणाऱ्या व ठेकेदाराची मदत करणाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) असल्यास, माथेरान (जि.रायगड) येथील ई-रिक्षा चालकांच्या ताब्यात देत असताना आरटीओ कार्यालयाने सदर रिक्षांचे दर निश्चित करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १०/०१/२०२४ रोजी दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने माथेरान सनियंत्रण समितीने बैठक घेऊन २० ई-रिक्षा प्रायोगिक तत्वावर चालविण्यासाठी परवानगी दिली आहे. सदर बाब मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर व त्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने परवानगी दिल्यास २० ई-रिक्षा हातरिक्षा चालकांना देण्याचे समितीने ठरविले. त्यानंतर मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/०४/२०२४ रोजी २० ई-रिक्षासाठी परवानगी दिलेली आहे. माथेरान नगरपरिषदेने माथेरान सनियंत्रण समितीच्या निर्देशानुसार माथेरान नगरपरिषद हद्दीतील नोंदणीकृत (परवानाधारक) हातरिक्षा चालकांकडून ई-रिक्षा प्रायोगिक तत्वावर चालविण्यासाठी अर्ज मागविण्यात आले असून तशी जाहीर सूचना दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार एकूण २४ नोंदणीकृत (परवानाधारक) हातरिक्षा चालकांनी अर्ज केले असून पडताळणीअंती २३ अर्ज वैध ठरले आहेत. त्यापैकी सोडत पध्दतीने २० नोंदणीकृत (परवानाधारक) हातरिक्षा चालकांची निवड करण्यात आली असून पुढील कार्यवाही सुरु आहे.
(३) अशा आशयाची मागणी नगरपरिषदेकडे केल्याचे दिसून येत नाही.
(४) व (५) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पनवेल यांनी दिनांक ०४/१०/२०२२ व दिनांक २५/११/२०२२ अन्वये माथेरान नगरपरिषद हद्दीत प्रायोगिक प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या ई-रिक्षांचे दर निश्चित केले आहेत.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दक्षिण मुंबईत फ्री वे (ऑरेंज गेट) ते ग्रँट रोड दरम्यान एलिव्हेटेड रस्त्याच्या प्रकल्पाच्या किंमतीत अवाजवी वाढ झाल्याबाबत

**(५५)** * **२३०१८ श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दक्षिण मुंबईत फ्री वे (ऑरेंज गेट) ते ग्रँट रोड दरम्यान एलिव्हेटेड रस्त्याच्या कामाचे टेंडर बृहन्मुंबई महानगरपालिकेने माहे मार्च, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाची रक्कम अवघ्या काही महिन्यांतच ६६२ कोटी रुपयांवरून थेट १,३३० कोटी रुपयांवर पोहोचली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू प्रकल्पाच्या रकमेत थेट दुपटीने झालेल्या वाढीबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदरहू प्रकल्पाच्या किमतीत अवाजवी वाढ करणाऱ्या महानगरपालिकेच्या संबंधित दोषीं अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

संबंधित कामांसंदर्भात बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे दिनांक २० जानेवारी, २०२४ रोजी फेरनिविदा मागविण्यात आली आहे.
(२) हे खरे आहे.

या प्रकल्पाच्या संदर्भातील निविदेत मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. व इतर विभागांच्या अभिप्रायांनुसार तांत्रिक बदल केल्याने तसेच उन्नत मार्गाच्या उंचीत वाढ, सुपर स्ट्रक्चरमध्ये आरसीसी / पीएससी गर्डरऐवजी स्टील गर्डरचा वापर इ. बाबींमुळे तसेच पट्टे बापुराव मार्गावर २० मीटर विस्तारा (स्पॅन) ऐवजी १०० ते १०५ मीटर विस्ताराचा (स्पॅन) अंतर्भाव, मेट्रोकरीता अतिरिक्त अनिवार्य स्पॅन, ध्वनिरोधक व दृष्यमानत रोधक (व्यु-कटर) यांचा समावेश, पुलाखालील रस्त्यांच्या पृष्ठभागांचे पुनर्स्थापन, रेल्वे हद्दीतील कामांचे देखरेख शुल्क, डिझाईन सल्लागार शुल्क इ. बाबींमुळे प्रकल्प खर्चामध्ये वाढ झाली आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विविध महामंडळांना दिलेल्या मुदत ठेवींची रक्कम प्राधिकरणास परत मिळण्याबाबत

**(५६) * २२९६३ श्री.सुनिल शिंदे, श्री.विलास पोतनीस :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) विविध महामंडळांना दिलेल्या मुदत ठेवींची रक्कम ४,३५५ कोटी रुपयांपर्यंत गेली असल्याची बाब दिनांक १ एप्रिल, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यातील बहुतांश महामंडळांनी मुदत उलटून गेल्यानंतरही व्याज आणि मुदत ठेवींची मुद्दलही मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास (एमएमआरडीए) आजमितीपर्यंत परत दिलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सद्य:स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले असल्याने या प्रकल्पांचा खर्च भागविण्यासाठी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बिकट आर्थिक परिस्थितीतून जाणाऱ्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (एमएमआरडीए) विविध महामंडळांना दिलेल्या मुदत ठेवींची रक्कम प्राधिकरणास परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनाच्या विविध महामंडळांना सुमारे रुपये ६४४.७२ कोटी इतकी रक्कम ठेव स्वरुपात दिली होती. त्यापैकी बहुतांश महामंडळांनी मुदत उलटून गेल्यानंतरही मुदत ठेव रुपये ६४४.७२ कोटी व त्यावरील व्याज रुपये २०१७.७९ असे एकूण २६६२.५१ कोटी इतकी रक्कम प्राधिकरणास परत केलेली नाही. तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाला सन २०१७-१८ दरम्यान रुपये १००० कोटी इतकी रक्कम कर्ज स्वरुपात व मुंबई-पुणे एक्सप्रेस वे साठी रुपये ५०५.११ कोटी इतकी रक्कम कर्ज स्वरुपात देण्यात आली आहे.

सद्य: स्थितीत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने विविध पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेतले आहेत. प्रकल्पाचा खर्च भागविण्यासाठी निधीची कमतरता असल्याने कर्ज प्राधिकरणास घ्यावे लागत आहे.

(४) व (५) प्राधिकरणाने मुदत ठेवींची विविध महामंडळांना दिलेली रक्कम वरील कर्ज व व्याज याची संबंधित महामंडळांनी परतफेड करण्याकरीता मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये ठरल्याप्रमाणे महामंडळाने मुदत ठेवीची रक्कम परत करण्याचे निर्देश दिलेले आहेत. परंतु, आजतागायत संबंधित महामंडळ/विभाग यांचेकडून रक्कम परत प्राप्त झालेली नाही. याबाबत वेळोवेळी रक्कम परत करण्यासाठी विभागस्तरावर वेळोवेळी पाठपुरावा करण्यात येत आहे.

-----------------

## पातुर (जि.अकोला) तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लग्न सोहळे व धार्मिक कार्यक्रमांमध्ये प्लास्टीक पत्रावळींचा वापर होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत असल्याबाबत

**(५७) * २३९२१ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात सर्वत्र मोठ्या प्रमाणात लग्न सोहळे व धार्मिक कार्यक्रमांमध्ये प्लास्टिक पत्रावळींचा वापर होत असून पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, प्लास्टिक पत्रावळींच्या वापरामुळे जनावरांच्या आरोग्यावर परिणाम होत असून तसेच राज्यात प्लास्टिक बंदी असताना बाजारात प्लास्टिक पत्रावळी सहजपणे उपलब्ध होत होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्लास्टिकच्या वस्तूंचे विघटन होत नाही किंवा त्या सडतही नाहीत तसेच जाळल्यास निघणारा धूर पर्यावरणासह मानवाला घातक ठरत असल्याने अनेक समस्या उद्भवत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्लॅस्टीकचा वापर टाळण्याच्या दृष्टीने प्रशासनासोबतच नागरिकांमध्येही जनजागृती होऊन वापरा आणि फेका (use and throw) अशा प्लास्टिक थर्माकोलचा वापर टाळून परिसर प्रदूषण विरहित करण्यासाठी योगदान देण्याच्या दृष्टीने शासनाने मागदर्शक तत्वे / सुचना लागू केल्या आहेत काय,
(४) असल्यास, शासनाने प्लास्टीक वापरावर बंदी घातली असूनही पातुर (जि.अकोला) तालुक्यासह संपूर्ण राज्यातही प्लास्टीकचा वापर सर्रास होत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(५) असल्यास, प्लास्टिक वापराचा विपरित परिणाम पर्यावरणावर तसेच मानवी आरोग्यावर होत असल्याने त्यावर बंदी आणणे आवश्यक असून, शासनाने प्लास्टिक बंदी प्रक्रियेची प्रभावीपणे अंमलबजावणी करुन दोषींवर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, अकोला यांनी दिनांक २६ जून, २०२४ रोजी कळविल्यानूसार प्लास्टिक पत्रावळीच्या वापरामुळे जनावराची मरतुक अथवा आरोग्य विषयक तक्रार प्राप्त नसल्याचे कळविलेले आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय.

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अविघटनशील कचरा (नियंत्रण) कायदा, २००६ अंतर्गत, प्लास्टिक आणि थर्माकॉल इत्यादीपासून बनवलेल्या अविघटनशील वस्तूंचे नियमन करण्यासाठी, महाराष्ट्र प्लॅस्टिक आणि थर्मोकॉल अविघटनशील वस्तूंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक), अधिसूचना, दिनांक २३/०३/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात आली. तसेच अधिसूचनेमध्ये दिनांक ११/०४/२०१८, ३०/०६/२०१८, १४/०६/२०१९, २८/०३/२०२२, १५/०७/२०२२ आणि ३०/११/२०२२ रोजी विविध सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.
(४) हे खरे नाही.
(५) पातुर नगरपरिषदेच्या दिनांक २५/०६/२०२४ रोजी इमेल द्वारे प्राप्त झालेल्या अहवालामधे पातुर शहरामध्ये सर्व प्रकारच्या अविघटनशील प्लास्टीकवर पूर्णत: बंदी आहे व त्याबाबत नगरपरिषदेद्वारे वेळोवेळी तपासणी मोहीम राबविण्यात येते. तसेच पातुर शहरामधे वेळोवेळी पथनाटयाद्वारे व भिंतीचित्र ध्वनिफितीद्वारे मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे काम झाले आहे. याव्यतीरीक्त नगरपरिषद पातुर हददीमधे पथक नेमुन दंडात्मक स्वरूपाची कार्यवाही करून १५ किलो प्लास्टीक जप्त करण्यात आले आहे व दंड स्वरूपात रुपये ५०००/ वसुल करण्यात आले आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्यात स्थानिक स्वराज्य संस्था, पोलीस विभाग महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या संयुक्त पथकामार्फत वेळोवेळी आस्थापनांना भेटी देण्यात येतात व एकल वापर प्लास्टिकच्या वस्तुंचे उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी आणि साठवणूक करणाऱ्या आस्थापनांवर कारवाई करण्यात येते. सन २०२३-२४ मध्ये एकूण १७८७५० आस्थापनानां भेटी देण्यात आल्या, त्यापैकी ८३३१ आस्थापनेवर कारवाई करण्यात आली व रुपये ४.५ कोटी इतका दंड गोळा करण्यात आला तसेच १९१ टन प्रतिबंधित प्लास्टिक जप्त करण्यात आले आहे.

तसेच, एकल वापर पलॅस्टिक बंदीबाबत वेळोवेळी प्रबोधनपर कार्यक्रमांचे आयोजन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत करण्यात येते.
(६) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वाहकांना तिकीट विक्रीसाठी वापरण्यात येणारे मशीन चालविण्याचे प्रशिक्षण देण्याबाबत

**(५८) * २३१३२ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सर्वत्र ऑनलाईन पेमेंटच्या माध्यमाद्वारे आर्थिक व्यवहार केले जात असतानाही राज्य परिवहन महामंडळाच्या ३४ हजारांपैकी १४ ते १५ हजार वाहकांना ॲण्ड्रॉइड इलेक्ट्रिक तिकीट मशीन चालविता येत नसल्यामुळे रोख पैसे देऊन प्रवाशांकडे तिकीट काढण्याचा आग्रह धरला जात असल्याची बाब माहे एप्रिल, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महामंडळाच्या यामधील विशेषत: वय झालेल्या वाहकांचा समावेश असून युपीआय पेमेंटवर तिकीट काढण्याचे योग्य प्रशिक्षण सदर वाहकांना व्यवस्थित मिळाले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळातील वाहकांना तिकीट विक्रीसाठी वापरण्यात येणारे ॲण्ड्रॉइड इलेक्ट्रिक तिकीट मशीन चालविण्याचे अद्ययावत प्रशिक्षण देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही अथवा उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) व (२) नाही.
(३) व (४) नवीन ॲन्ड्रॉईड तिकीट प्रणाली कार्यान्वित होत असताना सेवापुरवठादार यांनी रा.प. महामंडळातील सर्व वाहकांना ईटीआयएम मशीन चालवण्याचे वेळोवेळी प्रशिक्षण देण्यात येत आहे. तसेच मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी,पुणे येथे होणाऱ्या रा.प. कर्मचारी व अधिकारी यांचे प्रशिक्षण शिबिरा अंतर्गत एक सत्र नवीन ॲन्ड्रॉईड ईटीआयएम-ओआरएस कार्यप्रणाली बाबत ठेवण्यात यावे अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता केल्याबाबत

**(५९) * २३७४२ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांनी निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता करून शासकीय निधीचा अपव्यय केल्यामुळे सदरची निविदा प्रक्रिया रद्द करून त्यांचेवर कारवाई करणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजी मा.संचालक, नगर प्रशासन संचालनालय, मुंबई व जिल्हाधिकारी जळगाव यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची निविदा प्रक्रिया रद्द करून मुख्याधिकाऱ्यांवर कारवाई करणे संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) अंशतः खरे आहे.

बोदवड (जि.जळगांव) नगरपंचायतीच्या निविदा प्रक्रियेत मुख्याधिकारी यांनी केलेली अनियमितताबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींची दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२३ रोजीची तक्रार नगरपरिषद प्रशासन संचालनालयास प्राप्त झाली आहे.

तथापि, जिल्हाधिकारी, जळगाव यांनी कळविल्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाकडे या प्रकरणी स्थानिक लोक्रप्रतिनिधींची तक्रार प्राप्त झाली नाही.

(२) जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयाकडून जिल्हा नियोजन समितीअंतर्गत अनुज्ञेय निधीच्या मर्यादेत प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने, सुवर्णजयंती नगरोत्थान योजना (जिल्हा स्तर), नागरी दलित वस्ती सुधार योजना व नागरी दलित्तेतर योजना या ३ योजनांमधून दिनांक २२ सप्टेंबर, २०२३ रोजी बोदवड नगरपंचायतीस विविध विकास कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली.

जिल्हा नियोजन समितीच्या दिनांक ०५ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत प्राप्त मान्यतेनुसार बोदवड नगरपंचायतीद्वारे एकत्रित निविदा प्रक्रिया राबविण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव (१) (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.